जून २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प ११वे
अधिक ज्येष्ठ–निज ज्येष्ठ
शके १९४८
UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)
www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना :१५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07
बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र
सन्मति
मूल्य – १८ रु.


# ब्रिटिशकालीन जनगणना व जैन समाज



कीर्तन सम्राट तात्यासाहेब चोपडे



दिवाणबहाद्दूर अण्णासाहेब लट्ठे



सेठ माणिकचंद हिराचंद




डॉ. विलास संगवे






चंपतराय जैन




population according to ... 1,000 of each sex of various communities according to 1931 census is given below[1]:—

| Community | Sex | Unmarried | Married | Widowed |
|---|---|---|---|---|
| INDIA | M | 476 | 470 | 54 |
| | F | 388 | 505 | 107 |
| Hindu | M | 463 | 480 | 57 |
| | F | 324 | 507 | 169 |
| Jaina | M | 503 | 415 | 82 |
| | F | 337 | 442 | 221 |
| Sikh | M | 550 | 370 | 80 |
| | F | 411 | 475 | 114 |
| Muslim | M | 500 | 456 | 44 |
| | F | 358 | 513 | 129 |

1. For the diagram see Appendix XI.


J-3



... of females has resulted in stunting the growth of the Jaina community. The figures of Jaina population for the Bombay Presidency from 1881 to 1931 are given below:—

| Year | Jaina Population | | |
|---|---|---|---|
| | British Districts | Bombay States | Total for Bombay Presidency |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1881 | 2,40,436 | 1,00,631 | 3,41,047 |
| 1901 | 2,27,530 | 98,106 | 3,25,636 |
| 1911 | 2,12,074 | 79,013 | 2,91,087 |
| 1921 | 2,14,401 | 77,331 | 2,91,732 |
| 1931 | 1,99,814 | 87,353 | 2,87,167 |

1. Census of India, 1931, Vol. I, Part I, page 236.




## सन्मति मासिकावरील पहिली पीएच. डी. पूर्ण....

मध्य भागी असणारे संशोधक श्री. संदीप आंबेकर, त्यांच्या उजव्या बाजूला असणारे मार्गदर्शक प्रा. डॉ. उद्धव थोरवे व डाव्या बाजूला असणारे प्रा. डॉ. रमेश जाधव मराठी विभाग प्रमुख डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर हे दोघे संशोधकांचा सन्मान करताना...



## राष्ट्रीय शिष्यवृत्तीधारक (NMMS) विद्यार्थी–

*** एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज, बाहुबली (१० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक)**

१) अंश निमगोंडा पाटील १४९, २) प्रणिती संग्रामसिंह जाधव १४५, ३) आरुष प्रवीण कांबळे १४३, ४) वेदांत अजित पाचोरे १४०, ५) ऋतुजा गुंडाप्पा जाधव १३६, ६) निधी प्रशांत वाडकर १३५, ७) अपूर्वा सुभाष शिंदे १३५, ८) संस्कृती युवराज कांबळे १३१, ९) सार्थक सूरज पाटील १३१, १०) शहाबाद इमरान मुजावर १३०

*** जनतारा शैक्षणिक संकुल, जयसिंगपूर (८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक)**

१) सायली बाळीकाई १४६, २) श्रुती निकम १४५, ३) अक्षया कोरे १४१, ४) ध्रुव बेडक्याळे १४०, ५) तन्वी धुळासावंत १३९, ६) प्रगती बांदरे १३८, ७) सुफियान नंदगावे १३३, ८) रोहिणी आवळे १३०

*** सन्मती विद्यालय, तारदाळ (४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक)**

१) नैतिक राजकुमार खांडेकर १४२, २) वैदेही प्रवीण काळे १३९, ३) ऋषभ राजाराम खोत १३७, ४) वैष्णवी राजेंद्र शिरगुरे १२७

*** विद्यासागर हायस्कूल, अकिवाट (२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक)**

१) आयुष उमेश पाटील १४२, २) संस्कृती अजित चौगुले १३६

*** दादा नाना भोकरे हायस्कूल, कवठेसार (१ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक)**

१) प्रांजली वसंत महाजन १४०

**विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!**

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi

BHIM UPI

## * विदर्भ विभाग - (विशेष निकाल पान नं. ४२वर)



नाशित फातेम कादिर ९९.२०%
कंकुबाई कन्या, कारंजा



नैनेश चाणेकर ९९.२०%
गुरुदेव समंतभद्र वि., वेरुळ




अपेक्षा राऊत ९४.४०%



यश इंगोले ९४.४०%

श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हाय., कारंजा

सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## जून २०२६

❍ वर्ष: ७६ वे
❍ पुष्प ११वे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/–
❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/–

❍ संपादक मंडळ ❍

❍ **श्री. गोमटेश बेडगे,** एम.ए., बी.एड्.
❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी. (का.सं.)
❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.
❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.
❍ **श्री. प्रदीप धोतरे,** शास्त्री, एम.ए., बी.एड्.

**बँक खात्याचे विवरण –**
Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388
Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(अंकातील विचाराशी सन्मति-मासिक परिवार सहमत असेलच असे नाही.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✽ संपादकीय....हार्दिक अभिनंदन..!!! – डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ०४
✽ डॉ. नेमिनाथजी शास्त्री – रौप्य महोत्सवी संपादकीय कारकीर्द – प्रज्ञा डोणगावकर, कारंजा–लाड ०५
✽ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (लेख क्र. १४२)– आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी १०
✽ योगसार चिंतन (पुष्प १४) – प्रियदर्शन जैन १४
✽ अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह (भाग ३) –Discussion on Jainism Whatsapp १७
✽ सोलहकारण भावना भाय....! (लेखांक १४) –हर्षा वेखंडे, नागपूर १९
✽ पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ (लेखांक – २९) –विपुल खेडकर, नागपूर २३
✽ ब्रिटीशकालीन जनगणना आणि जैन समाज :... – रुपेश मडकर,छ. संभाजीनगर २८
✽ सन्मति (मार्च–एप्रिल : २०२६ ) अंकाबद्दलचे ... – विपुल खेडकर, नागपूर ३७
✽ पुस्तक समीक्षण–बारोमास : .... – सौ. उज्वला इंगळे, सौ. अनुराधा केळतकर ३९
✽ शालांत परीक्षांचा निकाल ४१

**✽ जीवनात सुख व शान्ती हवी असेल तर तत्त्वज्ञानाचा आश्रय घेऊन विवेक सदैव जागृत ठेवला पाहिजे. मनाला विकारांच्या आधीन न होऊ देता विवेकाचा लगाम लावला गेला पाहिजे. तत्त्वाभ्यासानेच हे शक्य आहे व तो उपाय स्वाधीन अतएव सुलभ आहे. तत्त्वरुची जसजशी वाढत जाईल तसतशी विवेकदृष्टी अधिक जागृत होईल आणि तिच्या साह्याने एरवी दु:खदायक वाटणारा प्रसंग, किंवा पदार्थ देखील सुखदायक वाटू लागेल.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

# संपादकीय....

## हार्दिक अभिनंदन..!!!

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ९४२०७७६६३१**

**सन्मती मासिकावरील पहिली पीएच. डी. पूर्ण...**

प्रिय वाचक, लेखक व हितचिंतक,

सादर जय जिंेंद्र!

मासिक सन्मतिचा व आपला ऋणानुबंध गत ७५ वर्षांहून अधिक काळाचा! प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांची सत्प्रेरणा व अनेक ज्येष्ठ विद्वान संपादकांच्या समर्पित योगदानाच्या फलस्वरूप हा साहित्यिक प्रवास अतिशय समृद्ध आणि विविधांगी झाला आहे. अर्थात् या प्रवासात सन्मतिचे पाथेय होते- आपल्या सर्वांची आस्था, आत्मीयता व सहयोग..!! म्हणूनच या सुदीर्घ वाटचालीत आलेल्या एका विशेष महत्त्वपूर्ण क्षणाच्या आनंदात आपणास सहभागी करुन घ्यावे, या हार्दिक भावनेपोटी हा शब्द प्रपंच!

मासिक सन्मतिच्या गत ७५वर्षांच्या धार्मिक व वाङ्मयीन कारकीर्दीवर सध्या तीन अभ्यासक संशोधनात्मक अध्ययन करीत आहेत.

त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये (छ. संभाजीनगर) मानव्य विद्याशाखेच्या अंतर्गत **मराठी जैन मासिक 'सन्मति' मधील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५०-२०००)** या विषयावर संशोधन करणारे अभ्यासक **श्री. संदीप धन्यकुमार आंबेकर, जिंतुर** यांना विद्यापीठातर्फे पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे, हे विदित करताना अत्यंत प्रसन्नता वाटते आहे. श्री. संदीप आंबेकर यांच्या परिश्रम व संशोधनाबद्दल त्यांचे सन्मति परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन करीत असतानाच, हा मासिक सन्मतिच्या वाटचालीतील एक गौरवास्पद प्रसंग आहे, हे देखील आवर्जून अधोरेखित करावेसे वाटते.

या प्रसंगी सन्मतिशी संबंधित सर्व आदरणीय पूर्वसूरींचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून आम्ही त्यांना अभिवादन करीत आहोत. त्यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सन्मतिची ही सर्वमंगल यात्रा निरंतर सुरू राहील, हा विश्वास आपणास देत आहोत.

**संशोधक श्री. संदीप धन्यकुमार आंबेकर, जिंतूर** हे एक प्राथमिक शिक्षक असून स्वाध्यायी आहेत. शाळेतील सर्व जबाबदारी सांभाळून त्यांनी हे कष्टप्रद कार्य केले आहे, त्यामुळे ते विशेष कौतुकास पात्र आहेत. त्यांचे **मार्गदर्शक प्रा. डॉ. उद्धव गो. थोरवे, प्राचार्य, मराठी विभाग प्रमुख, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना** हे होते. बहि:स्थ परीक्षक म्हणून डॉ. शिवाजी नागरे, मराठी विभाग प्रमुख, शंकरराव खंडेलवाल महाविद्यालय, अकोला, जि. अकोला यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. पीएच. डी. पदवीच्या मौखिक परीक्षा समितेचे अध्यक्ष म्हणून डॉ. रमेश जाधव, मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर यांनी अनमोल सहकार्य केले. पुनश्च विशेष अभिनंदन...!!!

**संपादकद्वयांचे सहर्ष स्वागत**

श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम या संस्थेच्या दि. ४ एप्रिल २०२६ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये मासिकाच्या नवीन संपादक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये विद्यमान तीन संपादक सदस्य पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आले आहेत. याशिवाय संस्थेचे संचालक व बाहुबलीच्या प्रशालेचे मुख्याध्यापक **श्री. गोमटेश बेडगे सर** आणि गुरुकुलाचे अधीक्षक व बाहुबलीच्या प्रशालेत संस्कृत या विषयाचे अध्यापन करणारे **श्री. प्रदीप धोतरे शास्त्री** या दोन नवीन संपादकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर संपादकद्वयांचे सहर्ष स्वागत आणि त्यांच्या हातून भविष्यात भरीव कार्य घडत राहो, साहित्यसेवा घडत राहो, अशी सद्भावना व्यक्त करीत आहोत.



# डॉ. नेमिनाथजी शास्त्री – रौप्य महोत्सवी संपादकीय कारकीर्द

– प्रज्ञा डोणगावकर, कारंजा–लाड

संपर्क : ९८८१९ ००६७२, ९४०४२ ००६७५

आपणा सर्वांना विदित करताना अत्यंत प्रसन्नता वाटते आहे की, **मासिक सन्मतिचे मुख्य संपादक डॉ. श्री. नेमिनाथजी बाळीकाई शास्त्री यांच्या मासिक सन्मतिच्या संपादकीय कारकीर्दीला यावर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत.** सन्मतिसारख्या जुन्या–जाणत्या दर्जेदार नियतकालिकाचे संपादक पद सलग २५ वर्षे सांभाळणे, सोबतच मासिकाचा विशिष्ट दर्जा व गुणवत्ता सांभाळणे, वाढवीत नेणे, तसेच युजीसी केअर लिस्टेड रिसर्च जर्नल म्हणून मान्यता मिळविणे, ही निश्चितच साधारण बाब नाही!

बाह्यत: अतिशय साधे, सरल व निगर्वी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या नेमिनाथजी सरांकडे पाहून त्यांच्या बौद्धिक व साहित्यिक कारकीर्दीचा अंदाज येणे, तसे कठीणच! पण त्यांच्याशी बोलायला सुरुवात केल्यानंतर लगेचच त्यांच्या अतिशय बुद्धिमान, अभ्यासू, चिंतनशील, सतत कार्यरत, परिश्रमी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडायला लागतात व या गुरुकुल स्नातकाप्रति मन आदराने व अभिमानाने भरून येते!

एका सामान्य शेतकरी कुटुंबातील एक मुलगा आपल्या बुद्धिमत्तेच्या व परिश्रमांच्या बळावर केवढी मोठी झेप घेऊ शकतो, याचे आदर्श उदाहरण म्हणजे डॉ. नेमिनाथजी यांचा आतापर्यंतचा जीवन प्रवास!

संपादक या नात्याने नेमिनाथजी सरांनी अनेकांबद्दल लिहिलेले आपण सर्वांनी वाचले असेलच, परंतु स्वतःबद्दल कधी लिहिले गेले नाही, हे साहजिकच! म्हणूनच त्यांच्या प्रेरणादायी जीवनपटाला अतिशय थोडक्यात शब्दबद्ध करण्याचा हा प्रयत्न!

(अर्थात् त्यांच्या अनिच्छेकडे थोडा कानाडोळा करून व क्षमायाचना पूर्वक....)

डॉ. नेमिनाथ शास्त्री यांचा जन्म दि. ११ फेब्रुवारी १९७७ रोजी दानोळी (जि. कोल्हापूर) येथे एका सत्शील शेतकरी कुटुंबात झाला. आई– वडील अशिक्षित असले तरी, मुलांना शिक्षणाची प्रेरणा मात्र ते सतत देत असत. नेमिनाथजींचे प्राथमिक शिक्षण दानोळी येथेच झाले, तर इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण बाहुबली गुरुकुलात झाले. प्रत्येक वर्षी गुरुकुलात प्रथम क्रमांक व गुरुकुलचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार मिळणे हे पुढील आयुष्यातील ज्ञानसाधनेचे जणू बीजारोपणच होते!

श्रद्धेय स्व. माणिकचंदजी भीसीकर गुरुजी यांनी आपल्या या गुणवंत शिष्यामधील सुप्त क्षमता अचूक ओळखल्या. त्यांच्या व श्रद्धेय गजाबेन यांच्या सत्प्रेरणेने नेमिनाथजी पुढील शिक्षणासाठी जयपूर येथे पोहोचले. राजस्थान विश्वविद्यालय, जयपूर येथून संस्कृत व जैनदर्शन या विषयांमध्ये शास्त्री ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढे सोलापूर येथून बी. एड. केल्यानंतर गुरुजींच्याच सूचनेनुसार बाहुबली गुरुकुल संस्थेतच अध्यापनास सुरुवात केली. नंतर अध्यापनाची जबाबदारी सांभाळीत एम. ए. पदवी मिळवली. एवढ्यावरच न थांबता, श्रद्धेय भीसीकर गुरुजींच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने **आचार्य कुंदकुंदेव विरचित प्रवचनसार** या ग्रंथावर डॉ. फूलचंदजी जैन, 'प्रेमी' यांच्या मार्गदर्शनाखाली नेमिनाथजींनी प्रबंध लेखन सादर केले. त्यासाठी त्यांना संपूर्णानंद विश्वविद्यालय, वाराणसी येथून

फेब्रुवारी २००७मध्ये पीएच. डी. पदवी प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे नेमिनाथजींनी परिश्रमपूर्वक स्वतःची उच्च शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

सध्या ते श्री बाहुबली विद्यापीठद्वारा संचालित एम. जी. शहा हायस्कूल या नामांकित विशाल शिक्षण संस्थेत पर्यवेक्षक पदाची जबाबदारी, तसेच गुरुकुल संस्थेतील अन्य विभागांमध्येही विविध कार्यभार सांभाळीत आहेत.

सोबतच त्यांनी संस्कृत व मराठी जैन साहित्य लेखन, शिक्षण, पत्रकारिता, संशोधन, संपादन, अनुवादन अशा विविध क्षेत्रांमध्ये अतिशय भरीव स्वरूपाची कामगिरी केली आहे. त्या विविधांगी योगदानाचे सिंहावलोकन करणे, या निमित्ताने उचित ठरेल.

**स्वतंत्र साहित्य लेखन–**

१) बाहुबली गुरुकुलाचा गौरवशाली इतिहास

२) परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज – व्यक्तित्व व कर्तृत्व

३) गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या आठवणी

४) भद्रायण (गुरुदेव श्री समंतभद्रजी महाराज यांचे जीवनचरित्र)

५) भद्र आनंद (इयत्ता पाचवी)

६) श्रीभद्र संस्कार (इयत्ता सहावी)

७) श्रीभद्र तत्त्वमाला (इयत्ता सातवी)

८) गुरुदेव श्री समंतभद्र महाराज : जीवनदर्शन (कन्नड)

९) मकराना ते बाहुबली : एका अथक प्रवासाची यशोगाथा

१०) तीर्थंकर चंद्रप्रभ – जीवनचरित्र

११) एम. ए. जैनोलॉजी अँड प्राकृत या द्विवर्षीय अभ्यासक्रमातील एकूण ३२ पैकी १७ घटकांचे लेखन.

यापैकी **१) बाहुबली गुरुकुलाचा इतिहास २) गुरुदेव समंतभद्र महाराज – व्यक्तित्व आणि कर्तृत्व** ही दोन पुस्तके म्हणजे संशोधनपर लेखनाचा उत्कृष्ट आविष्कार म्हणता येतील. अनेक वर्षांच्या अथक परिश्रमातून साकारलेली ही दोन पुस्तके म्हणजे जणू एक डी. लिट्.साठीचे प्रबंधच आहेत, असा अभिप्राय प्राचार्य डॉ. शांतिकुमार पाटील, जयपूर यांनी दिला आहे. एवढे साहित्यिक, संशोधन व संदर्भ मूल्य या ग्रंथांचे आहे!

**संकलन, संपादन व अनुवादन–**

डॉ. नेमिनाथजींनी प्रसंग परत्वे पुढील काही पुस्तकांचे संकलन व संपादन केले आहे, तर काही पुस्तकांचे अनुवादन देखील केले आहेत.

१) समंतभद्रायण (गुरुदेव श्री समंतभद्रजी महाराज यांची प्रवचने)

२) बाहुबली पूजांजली

३) गुरुकुल पूजापाठ

४) दीपावली पूजन

५) माणिक विचार संग्रह

६) माणिक चिंतन

७) मा. भी.चे अग्रलेख

८) पंडितजींचा बटवा

९) भद्रभारती

१०) गुरुभद्र वाणी

११) भद्रपुष्पांजली (समाधिशतक व इष्टोपदेश यांच्या भावार्थासह)

१२) गुरुकुलमाता गजाबेन : गौरवगाथा

१३)गुरुदेव समंतभद्र महाराज : गौरवगाथा (भा.१)

१४)गुरुदेव समंतभद्र महाराज : गौरवगाथा (भा.२)

१५) गुरुदेवश्री भद्रकथा कुंज

१६) स्वरूपसंबोधन

१७) प्रश्नोत्तर रत्नमालिका

१८) द्वादशानुप्रेक्षा (क्षत्रचूडामणी)

१९) सामायिक पाठ संग्रह

२०) एम. ए. जैनालॉजी अँड प्राकृत या द्विवर्षीय अभ्यासक्रमातील ८ पैकी ४ पुस्तकांचे संपादन कार्य.

अशाप्रकारे आजपर्यंत एकूण २२पेक्षा जास्त पुस्तकांचे संपादन तर काही पुस्तकांचे अनुवादन केले आहे.

**काही प्रमुख संशोधित पुस्तके–**

१) पत्रपीयूष (दोन आवृत्ती)

२) मंगलनिनाद (दोन आवृत्ती)
३) प्रबोधसार
४) अध्यात्मनवनीत
५) क्रांतिवीर हुतात्मा मोतीचंद
६) सल्लेखना : एक तत्त्वज्ञानात्मक अभ्यास

अशा प्रकारे ३०हून अधिक पुस्तकांचे संशोधन कार्य सहजतेने घडले आहे.

**संशोधकांना मार्गदर्शन व सहकार्य–**

नेमिनाथजींनी पीएच.डी. फेब्रुवारी २००७ मध्ये मिळवली. तोपर्यंत कोणत्याही अभ्यासकाने गुरुकुल शिक्षण संस्था व संबंधित विषयांवर संशोधन करून विद्यावाचस्पती ही पदवी मिळवली नव्हती. सर्वप्रथम **सौ. कल्पना संतोष मुळावकर (अंबाजोगाई ) यांचे संशोधनाचे कार्य गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे शैक्षणिक विचार** याविषयी सुरू होते. त्यांच्या अध्ययनासाठी सरांनी आत्मीय सहयोग दिला आहे. त्यानंतर मूळ कारंजा निवासी व आता नांदेड येथे कार्यरत **श्री. पंकज खंडारे यांना गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा ऐतिहासिक आढावा** याविषयी नाव सुचवण्यापासून संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत शक्य तितके सर्व सहकार्य व मार्गदर्शन सरांनी केले आहे. या दोन्ही अभ्यासकांना पीएच.डी. पदवी मिळाली आहे.

त्याशिवाय **श्री. संदीप आंबेकर, जिंतूर** यांनी नुकतीच **सन्मति मासिकाच्या आधारे पीएच. डी. पूर्ण केली आहे.** त्यांनाही विषय सुचवण्यापासून पुढील सर्व प्रकारे सरांचे सहकार्य लाभले आहे.

याशिवाय अन्य चार अभ्यासकांचे संशोधन कार्य सुरू आहे. त्यांनादेखील सरांचे सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन लाभत असते. **सौ. वर्षा गडेकर (अहिल्यानगर) या गुरुदेवांच्या अप्रकाशित पत्रांवर संशोधन** करीत आहेत. **श्री. वर्धमान लट्ठे (नांदणी)** हे मासिक सन्मतिच्या विगत २५ वर्षांतील विशेषांकांचा चिकित्सक अभ्यास सोलापूर विद्यापीठातून करीत आहेत. **सौ. रेखा धुळप (कराड) या सन्मति मासिकातील मूल्यशिक्षण** याविषयी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून संशोधन करीत आहेत. **श्री. दीपक कोण्णूरे हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून सन्मति, रत्नत्रय व जैनबोधक यांचे योगदान** याविषयी संशोधन करीत आहेत.

याशिवाय जैन धर्मातील अन्य कोणत्याही विषयावर संशोधन करीत असणाऱ्या संशोधकांना अनेकांत शोधपीठ या विभागाच्या माध्यमातून डॉ. नेमिनाथजी निरंतर सहयोग करीत असतात, मार्गदर्शन करीत असतात.

**शैक्षणिक क्षेत्रातील योगदान–**

डॉ. नेमिनाथजींचा शिक्षण क्षेत्रातील अनुभव व संपादकीय कौशल्याच्या फलस्वरूप शालेय पाठ्यक्रम निर्धारण व पाठ्यपुस्तक संपादन या कार्यासाठी २०१० ते २०१९ अखेर त्यांना शिक्षण विभागाकडून वेळोवेळी आमंत्रित केले जाते होते.

सन २०१०पासून ते आजपर्यंत शालेय पाठ्यपुस्तक व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील जैनालॉजीच्या पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात डॉ. नेमिनाथजींचे योगदान पुढीलप्रमाणे आहे. –

✻ इयत्ता नववी पाठ्यपुस्तकाचे समीक्षक (२०१०), ✻ इयत्ता दहावी संस्कृत पाठ्यपुस्तकाचे संपादन (सन २०१२), ✻ इयत्ता दहावी संस्कृत संपूर्ण कृतिपुस्तिका व संस्कृत संयुक्त कृतिपुस्तिका याचे संपादन (सन २०११), ✻ इयत्ता बारावी संस्कृत कृतिपुस्तिका व इयत्ता अकरावी संस्कृत कृतिपुस्तिका यांचे संपादन (सन २०११), ✻ इयत्ता दहावी संपूर्ण व संयुक्त आणि इयत्ता बारावी संस्कृत अध्यापक प्रशिक्षण साहित्य निर्मितीचे संपादन (सन २०१२), ✻ इ. बारावी संस्कृत पाठ्यपुस्तकातील **महावीरचरितम्** या पाठाचे लेखक ✻ तसेच संस्कृत या विषयाचे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभाग–स्तरीय आणि राज्यस्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक – प्रशिक्षक पदाची जबाबदारी सांभाळली आहे. तसेच १०वी आणि १२वी बोर्ड परीक्षेचे परीक्षक, चीफ

मॉडरेटर, स्क्रूटिनी कमिटीचे सदस्य इत्यादी म्हणून कामाचा अनुभव घेतला आहे.

* सन २०११पासून ते आजपर्यंत शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) येथील सर्टिफिकेट कोर्स, पीजी डिप्लोमा कोर्स आणि एम. ए. (जैनालॉजी अँड प्राकृत) या तीन कोर्सचे अधिव्याख्याता, पेपर सेटर, मॉडरेटर आणि पेपर सेटिंग कमिटीचे चेअरमन या रूपाने डॉ. नेमिनाथजींनी कार्यभार सांभाळला आहे.

**चर्चासत्रातील सहभाग–**

डॉ. नेमिनाथजी यांचे वक्तृत्व म्हणजे स्पष्ट उच्चार, ओघवती सुगम भाषा, पूरक सुभाषितांची योजना यांची मेजवानी! सोबतच विषयाला सखोल स्पर्श व आगमानुसार विवेचन ही त्यांच्या वक्तव्याची वैशिष्ट्ये स्पष्टपणे ध्यानात येतात.

त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रे, संगोष्ठी, परिषदा यामध्ये सहभागी होऊन अभ्यासपूर्ण सादरीकरण केले आहे. सरांनी श्रवणबेळगोळ व दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध सादर केले आहेत. याशिवाय लाडनूं, अरथूना, श्रवणबेळगोळ, जयसिंगपूर, दिल्ली, कोल्हापूर येथील राष्ट्रीय सेमिनारमध्येही शोध निबंध वाचले आहेत. मराठी जैन साहित्य संमेलनात गेल्या सात वर्षापासून सातत्याने त्यांचे व्याख्यान आयोजित केले जाते.

**पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र जैन इतिहास परिषदेच्या अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद डॉ. नेमिनाथजींनी भूषविले आहे.**

याशिवाय बाहुबली येथे चार वेळा राष्ट्रीय स्तरावरील विद्वत संगोष्ठींचे संयोजन केले आहे.

**मासिक सन्मतिचे संपादन कार्य –**

गुरुकुल संस्थांमधील कामाचा समान धागा असल्याने डॉ. नेमिनाथजींशी माझा बऱ्याच काळापासून परिचय होताच. पण मी गत पाच वर्षांपासून सन्मतिच्या संपादक मंडळात सहभागी झाल्याने या परिचयाला आता अनेक नवीन आयाम जोडले गेले आहेत. सर्वांचे मत विचारात घेऊन काम करण्याची पद्धत, मासिकासंबंधी प्रत्येक निर्णय सारासार विवेकबुद्धीने घेण्याची संवय, प्रकाशित करण्यासाठी आलेल्या साहित्याची काटेकोर तपासणी, लेखक–वाचक यांच्या प्रति आस्था व विनयभाव ही मला जाणवलेली सरांच्या कार्यशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये!

सरांच्या या पंचवीस वर्षांच्या संपादन कार्यकालात त्यांनी सुमारे २००पेक्षा जास्त अग्रलेख लिहिले आहेत आणि ५०पेक्षा अधिक लेख लिहिले आहेत. तसेच किमान २५०हून अधिक अंक प्रकाशित झाले आहेत तर विविध विषयांवर आजअखेरच्या १०४ अंकापैकी ३८ विशेषांक प्रकाशित केले आहेत.

प्रकाशनाशी संबंधित इतरही कामे, जसे– अंकाची मांडणी, प्रुफ रीडींग, वर्गणीदारांशी संपर्क, वितरण व्यवस्था इ. अनेक जबाबदाऱ्या सर काळजीपूर्वक हाताळतात. हे सर्व पाहून मला बरेचदा असे वाटते की, सरांचा दिवस २४ तासाऐवजी ३०–३५ तासांचा असतो की काय...?

मासिक सन्मतिची ही सर्वांगीण प्रगती पाहून अनेक विद्वान, लेखक, वाचक वेळोवेळी मनापासून कौतुकाची पावती देत आहेत, याचे श्रेय निश्चितच सरांच्या संपादन कौशल्याला व अपार मेहनतीला आहे! मराठी जैन पत्रकारिता क्षेत्रातील ही नक्कीच महत्त्वाची उपलब्धी म्हणावी लागेल.

**स्फुट कार्य–**

सन २००९ ते २०२६ अशी गेली सतरा वर्षे बाहुबली गुरुकुलातर्फे प्रकाशित होणाऱ्या अतिशय देखण्या व माहितीपूर्ण अशा **बाहुबली दिनदर्शिका व गुरुदेव समंतभद्र दैनंदिनी** तयार करण्याचे कार्य नेमिनाथजी सरांच्याच संकल्पनेतून साकार होत आहेत. त्यासाठी स्वतः मेहनत करतात.

याशिवाय शिक्षण संक्रमण, तीर्थंकर, श्राविका, सार्वधर्म, जैनबोधक, रत्नत्रय, प्राकृत–विद्या अशा इतर मासिकात सुद्धा त्यांचे आलेख प्रकाशित झाले आहेत. अनेक संस्थेशी संलग्न राहून वेळेवेळी मार्गदर्शन व कार्य करतात.

**स्वाध्यायः परमौषधिः –**

नेमिनाथजींचा मूळ पिंड आध्यात्मिक असल्याने आपल्या सर्व व्यस्ततेतून वेळ काढून ते गेल्या १४ वर्षांपासून सातत्याने दररोज सायंकाळी बाहुबली येथे प्रवचन करीत असतात.

वेगवेगळ्या धार्मिक ग्रंथांवर आधारित किमान २५ प्रश्नमंजुषा सरांनी काढल्या आहेत. प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यातील धर्म शिक्षण शिबिर व विधान, ब्र. सुजाताताईंच्या ४०हून अधिक झालेल्या करणानुयोगच्या शिबिरास सहकार्य अशा विविध मार्गांनी स्वाध्यायाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात.

**कर्तव्यपूर्तीचा दिव्यानंद–**

या निमित्ताने आदरणीय डॉ. नेमिनाथजींशी संवाद साधला असता त्यांनी त्यांच्या स्वभावभूत नम्रतेने खालीलप्रमाणे प्रांजळ व कृतज्ञतापूर्ण मनोगत व्यक्त केले, ते त्यांच्याच शब्दांत ऐकू या....

डॉ. नेमिनाथजी – 'आता या मासिकाची जबाबदारी स्वीकारून २५ वर्षे पूर्ण होत आहेत. एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण होत असल्याने थोडं मागे वळून पाहत आहोत. यानिमित्त या कार्याचा परिचय करवून प्रतिक्रमण, प्रत्याख्यान व आलोचना याप्रमाणे सिंहावलोकन करीत आहोत. कृपया वाचक वर्ग यास अन्यथा समजून घेऊ नये, अशी सर्वांना करबद्ध विनंती...!

**सन्मति मासिकाचे संस्थापक संपादक बालब्रह्मचारी न्यायतीर्थ माणिकचंदजी भीसीकर गुरुजी** यांनी आमच्यावर ही जबाबदारी सोपवली आणि आम्हीही तितक्याच आत्मीयतेने व एकनिष्ठपणे ही जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. प्रारंभीच त्यांनी **आमचे नामकरण नेमिनाथ शास्त्री** असे केले. त्यासोबत त्यांनी आम्हाला काही आत्मीयतेने सूचना दिल्या. आम्ही **त्यांचे हे अपत्य आपलेच अपत्य समजून त्याचे संरक्षण, संवर्धन व संगोपन करण्याचा प्रयत्न केला.** प्रसंगी काही आर्थिक प्रलोभने दूर करावी लागली, क्षेत्रापासून दूर जाण्याचा मोह टाळला, अनेक लोकांनी अनेक भौतिक प्रगतीचे मार्ग सुचवले, काहींनी प्रशंसा केली, काही लोकांची निंदा ऐकावी लागली. पण दिलेला शब्द पाळायचा, 'प्राण जाये पर वचन न जाये' या उक्तीनुसार एक मनी दृढनिश्चयता असल्याने चिकाटीपूर्वक सांभाळण्याचा प्रयत्न केला. निश्चितच यात अल्प प्रमाणात का होईना, पण समाधानकारक कार्य घडू शकले.

**साहित्यसेवेसोबत आत्मसेवा–**

आमचे परम आराध्य दैवत परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या ध्येयवाक्यानुसार **'आदहिदं कादव्वं, जई सक्कइ परहिदं च कादव्वं !'** या सुवचनानुसार सहजतेनेच साहित्यसेवा यासोबत धर्मसेवाही घडली, पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे आत्मसाधनाही खूप सुंदर रीतीने घडली. त्यांच्या विचारानुसार धर्मकार्य करण्याची अपूर्व संधी अनायास, सहजतेने मिळत गेली. यातून परिणाम विशुद्धी विलक्षण घडली, यात शंका नाही.

विशेष करून वेगवेगळ्या निमित्ताने गुरुदेव श्री समंतभद्र महाराज, बालब्रह्मचारी माणिकचंदजी भीसीकर गुरुजी, बालब्रह्मचारी माणिकचंदजी चवरे तात्या गुरुजी या **गुरुत्रयांचे जीवन व विचार, त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून समजले**. विशेष म्हणजे चार-पाच वर्षे मेहनत करून, गुरुदेवांच्या स्वहस्ताक्षरातील तीसहून अधिक डायऱ्या आणि शेकडो पत्रे वाचून गुरुदेवांचे जीवन चरित्र आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व खूप जवळून अनुभवण्याचा प्रयत्न केला. त्यातून खूप काही शिकण्यास मिळाले यात शंकाच नाही..... नि:स्वार्थपणे कार्य करण्याची ज्योत टिकून राहिली. किंबहुना मानव जन्म सार्थक झाल्याचा अनुभव आला !'

खरोखर गुरुकुल संस्था व तेथील गुरुजनांच्या परीस स्पर्शाने नेमिनाथजींनी आपले जीवन ज्ञानसाधनेच्या सुवर्णप्रभेने जणू उजळून टाकले आहे! ही ज्ञानप्रभा सदैव अशीच तेजोमय असावी व तिच्या प्रकाशात इतर अनेकांचा जीवनपथ उजळून निघावा, यासाठी अनेक हार्दिक शुभेच्छा!

*****

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १४२)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

या असार संसारामध्ये अत्यंत दुर्लभ असा यथाजातरूपपणा (नग्नपणा) धारण करणाऱ्या या विरक्त जीवाने पुरुषार्थ केला. परंतु या यथाजातरूपपणाचा अनादी काळापासून अभ्यास नसल्याने अत्यंत अप्रसिद्ध आहे. त्याला प्रसिद्ध करण्यासाठी आचार्य त्या यथाजातरूपपणाचे बहिरंग व अंतरंग स्वरूप पुढील दोन गाथेत सांगतात. जे अंतरंग व बहिरंग चिन्ह आहे, ते आत्म्याच्या शुद्धीचे गमक (ज्ञान करून देणारे) आहे. शुद्धी म्हणजेच सिद्धी, शांती, आत्मलाभ होय. मोहाचा अभ्यास खूप झाला, पण आज पर्यंत या जीवाने स्वात्मानुभवाचा कधी अभ्यास केला नाही.

ज्यावेळी ज्ञाननेत्र उघडतील व वस्तूचे यथार्थ स्वरूप कळेल तेव्हाच हा अभ्यास होईल. या अभ्यासाने कुशलता प्राप्त झाली असता निश्चितच सिद्धी हस्तगत होत असते, म्हणून यथार्थ मर्निपर्याय प्रकट करण्यासाठी अंतरंग व बहिरंग स्वरूपाचे ज्ञान असणे, अत्यंत आवश्यक आहे. बहिरंग म्हणजेच द्रव्यलिंगपणा आणि अंतरंग म्हणजेच भावलिंगपणा होय. या दोन्हीचे स्वरूप आचार्यदेव असे स्पष्ट करीत आहेत.

**जधजादरुवजादं उप्पाडिदकेसमंसुगं सुद्धं।**
**रहिदं हिंसादीदो अप्पडिकम्मं हवदि लिंगं।। २०५।।**
**मुच्छारंभविजुत्तं जुत्तं उवजोगजोगसुद्धीहिं।**
**लिंगं ण परावेक्खं अपुणब्भवकारणं जेण्हं।।२०६।।**

**अन्वयार्थ – (जधजादरुवजादं)** जन्माच्या वेळी जसे रूप असते तसे रूप (नग्नता)**(उप्पाडिदकेसमंसुगं)** डोक्याचे व दाढी मिशाचे केशलोच केलेले **(हिंसादीदो रहिदं)** हिंसा इत्यादींनी रहित **(सुद्धं)** शुद्ध (निष्परिग्रहता) **(अप्पडिकम्मं)** शरीर संस्काराने रहित **(लिंगं)** असे हे श्रमणपणाचे बहिरंग चिन्ह **(भवदि)** आहे.

**(मुच्छारंभविजुत्तं)** ममत्व व आरंभाने रहित **(उवजोगजोगसुद्धीहिं)** उपयोग आणि योगाच्या शुद्धीने युक्त **(ण परावेक्खं)** पराच्या अपेक्षेने रहित **(जेण्हं)** जिनेन्द्र देवांनी सांगितलेले **(लिंगं)** श्रमणपणाचे अंतरंग वेष **(अपुणब्भवकारणं)** मोक्षाचे कारण आहे.

**साधूंचे मुख्य बाह्य चिन्ह**

कोणत्याही व्यक्तीला ओळखण्याची दोन चिन्हे असतात. एक बहिरंग चिन्ह व दुसरे अंतरंग चिन्ह. जे बाहेरून स्पष्ट दिसते ते बहिरंग होय. ज्याप्रमाणे कोणी एक मनुष्य सैन्यामध्ये भरती झाला असेल तर त्याला सैनिक म्हणतात. सैनिक म्हणून ओळखण्यासाठी त्याला तसा बाह्य पोशाख दिला जातो. विशिष्ट ड्रेस, डोक्याला वेगळी टोपी, कमरेला पट्टा, हातामध्ये बंदुक, पायात बूट पायमोजा इत्यादी. त्याला पाहताच पोशाखावरून हा सैनिक आहे, अशी त्याची ओळख होते. तसेच त्याची शूरवीरता, धैर्य, आत्मसमर्पण, नि:स्पृहता, देशप्रेम हे त्या सैनिकाचे अंतरंग चिन्ह आहेत. हे भाव होण्यासाठी बाह्य पोशाख देखील निमित्त असते. त्याप्रमाणे श्रमण अवस्थेचीही बाह्य पाच लक्षणे आहेत. १) नग्नत्व, २) केशलोच, ३) निष्परिग्रहता, ४) हिंसा इत्यादीने रहित असणे व ५) शरीर शृंगाराने रहित. तसेच अंतरंग पाच चिन्हे आहेत. १) मूर्च्छारहित, २) आरंभरहित, ३) उपयोगविशुद्धी, ४) योगशुद्धी व ५) निरपेक्षता

**१) यथाजातरूपता अर्थात नग्नता**

विरक्त ज्ञानी जीवाला मोहराग–द्वेषाचा अभाव झालेला असतो. त्यामुळे आपोआप नग्नता प्रकट होते. वस्त्र अलंकार ग्रहण करण्याचा भाव

मोहाशिवाय होत नाही. अंतरंगात विकार उत्पन्न होते. ते झाकण्यासाठी वस्त्र परिधान केले जाते. ज्याच्या अंतरंगात निर्विकारता असते, तोच नग्नस्वरूप धारण करू शकतो. जन्माच्या वेळी लहान बाळ जसे नग्न असते, त्याच्या अंगावर कोणतेच वस्त्र, अलंकार इत्यादी नसतात. तशी नग्नता धारण करणे यास यथाजातरूपत्व म्हणतात. अंतरंग निरागसता, निर्विकारता, निष्पापतेचे हे प्रतीक आहे. ज्याला शरीरापासून भेद-विज्ञान झाले आहे, तो या शरीराला सजविण्यासाठी वस्त्र, अलंकार इत्यादी परिधान करण्याची इच्छा करीत नाही. एक लंगोटी परिधान केली असता त्याच्या पाठोपाठ अनेक विकल्प होतात. तर अन्य परिग्रहाचे काय सांगावे? त्यामुळे निर्विकल्प समाधी होत नाही. नेहमी भय, चिंता, आकुलता होत असते. म्हणून म्हणतात की..

**चाह लंगोटी की दुःख भालै,**
**भालै न समता सुख कभी नर बिना मुनिमुद्रा धरै।**

बाहेरून केवळ नग्न होऊन उपयोग नाही. कारण पशू देखील नग्न असतात. अंतरंगातून नग्नता असावी. तरच बाहिरंग नग्नता शोभून दिसते. साधूला ओळखण्याचे बाहेरचे स्पष्ट लक्षण म्हणजे नग्नता होय.

**२) केशलुंचन**

राग-द्वेष-मोहाचा अभाव झाल्यामुळे डोक्यावर केस ठेवणे किंवा त्याला तेल लावणे, विंचरणे आदी भाव होत नाहीत. या प्रवृत्तीचा अभाव असतो. केस मोठे झाल्यावर त्यात लिखा आदी जंतू उत्पन्न होतात. केस कायम ठेवू शकत नाही व त्यांचा शृंगार करू शकत नाही. तसेच कात्रीने कापू पण शकत नाही. तर एकच पर्याय आहे की स्वतःच्या हाताने केस उपडणे तसेच दाढी व मिशीचे केस देखील स्वतःच्या हातानेच उपडणे. साधू दीक्षा घेतानाच केशलुंचन करतात. नंतर वेळोवेळी अशाच प्रकारे केशलोच करीत असतात. कात्रीने केस कापले तर चालत नाही का? एवढा त्रास का करून घेतात किंवा इतरांच्या कडून केस काढून घेतले तर त्यांना पैसे द्यावे लागतात किंवा कात्री जवळ बाळगावी लागते. श्रावकाकडे याचना करावी लागते, म्हणून दीनता, याचना, ममता, लज्जा इत्यादी अनेक दोष उत्पन्न होतात. या दोषांचा त्याग करण्यासाठी मुनी स्वाधीनतेने स्वतःच्या हातानेच केस काढतात. हाताने केस उपटल्याने ते मुळासकट निघतात. त्यामुळे त्यांची लवकर वाढ होत नाही. अन्य साधनांचा वापर केल्यास पुन्हा पुन्हा केसलोच करावे लागेल. तसेच त्यात त्रसजीवांची हिंसादेखील होते.

केशलोच करण्याची पाच कारणे आहेत. १) संमूर्छन, विकलत्रय जीवांची उत्पत्ती टाळण्यासाठी, २) रागादी भावांना दूर करण्यासाठी, ३) आत्म्याचे सामर्थ्य प्रकट करण्यासाठी, ४) उत्कृष्ट तप करण्यासाठी, ५) मुनिपणाचा वेश दर्शविण्यासाठी. केशलोच केल्यामुळे वैराग्य भावना दृढ होते. कर्म निर्जरेचे सर्वात मोठे साधन आहे. शांतभावाने वेदना सहन केली जाते. त्यामुळे आत्मिक सामर्थ्य वाढते. केशलोच करतेवेळी मुनिराज असा अनुभव करतात की, ज्याप्रमाणे शेतकरी जमिनीवर वाढलेले गवत हाताने उपटून काढतो त्याप्रमाणे मी या मस्तकरूपी जमिनीवरील केशरूपी गवत उपटत आहे.

त्यामध्ये माझे काय आहे? केशलोच केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर वैराग्याचे विलक्षण तेज चमकते, म्हणून हे साधूंचे बाह्यलिंग मानले जाते.

**३) शुद्धता (अकिंचन)**

त्यांचे शरीर निर्मळ असते. कोठेही विकृती, वक्रता, कषाय झळकत नाही. जेथे परिणामात मलिता असते, तेथे चेहऱ्यावर कुटीलता सहजतेने दिसते. साधूंचे भाव निर्मळ असतात. त्यामुळे चेहऱ्यावर सरलता व शुद्धता दिसते. त्यांचा चेहरा पाहताच अंतरंगातील भावांची विशुद्धता सहजतेने लक्षात येते.

मोह-राग-द्वेषांचा अभाव झाल्याने अकिंचनता अर्थात कोणतीही वस्तू जवळ बाळगण्याची भावना होत नाही, म्हणून शुद्धता, निष्परिग्रहता दिसते. संयम व ज्ञानाच्या

उपकरणाशिवाय अन्य वस्तू जवळ ठेवत नाहीत.

**४) हिंसादीने रहितपणा**

मोह-राग-द्वेषांचा अभाव झाल्याने मुनिराजांचे शरीरावरील ममत्व दूर झालेले असते. त्यामुळे या शरीराला सांभाळण्यासाठी कोणतीही हिंसादी क्रिया करीत नाहीत. स्नान करण्याचे भाव सुद्धा होत नाहीत. त्यामुळे ते अस्नानव्रत स्वीकारतात. स्नान करीत असताना शरीरावर असणाऱ्या अनेक त्रस व स्थावर जीवांची हिंसा नियमाने होते. ते पाणी जिथून वाहत असते तेथील जीवजंतूंची देखील विराधना होते. दात घासण्याचा सुद्धा त्याग करतात. मुनींच्या बाहेरील क्रियेवरून हे प्रकट होते की ते परम दयाळू असतात. त्रस व स्थावर जीवांचा घात माझ्या द्वारे होऊ नये, म्हणून चालताना, झोपताना, आहार घेताना यत्नाचारपूर्वक प्रवृत्ती करतात. कोणाचे मन दुखवेल म्हणून कधीही असत्य, कटुक, पीडा देणारे, मर्मघाती वचन बोलत नाहीत. कोणतीही वस्तू कधी न देता स्वीकारत नाहीत. आवश्यकता असली तरी कधीही जंगलातील फळे व विहिरीचे पाणी सुद्धा घेत नाहीत. ते सर्व दोष टाळून कायेने शीलव्रताचे पालन करतात. कधी कोणताही आरंभ करीत नाहीत. तसेच सचित्त-अचित्त परिग्रह ठेवत नाहीत. अशा प्रकारे त्यांचे द्रव्यलिंग पाचही पापाने रहित असते.

**साधूंचे अंतरंग लक्षण**

**१) मूर्च्छेचा अभाव**

मूर्च्छा म्हणजे ममत्व परिणाम. भावलिंगी साधूंच्या मध्ये अनंतानुबंधी, अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावर या तीन कषाय चौकडींचा अभाव झाल्याने कोणत्याही परद्रव्याविषयी आपलेपणा राहत नाही. तेथे परम निर्मता प्रगट होते.

ममत्व परिणाम नेहमी बाह्यपदार्थात असते स्व-पदार्थांमध्ये मूर्च्छा नसते. ज्यांनी स्वतःला ज्ञानमात्रस्वरूपी जाणले आहे त्यांच्या जवळ ममत्व कोठे असणार? पदार्थांमध्ये ज्याची आत्मबुद्धी असते त्या जीवाजवळ मूर्च्छा असते. परद्रव्याला लक्ष न करता ममता करून दाखवा म्हटले तर ते शक्य नाही. जेथे चतुर्थ-पंचम गुणस्थानवर्ती श्रावकाला मूर्च्छा नसते, तेथे भावलिंगी साधूंना कोठून असणार? स्वतःला विसरून परद्रव्यात अहंबुद्धी, ममत्व बुद्धी करणे मूर्च्छा होय. सम्यग्दृष्टी गृहस्थाला स्वद्रव्य व परद्रव्याचा विवेक असल्याने परद्रव्यासंबंधी दर्शनामोहजनित मूर्च्छा असत नाही, पण अप्रत्याख्यानावरण व प्रत्याख्यानावरण कषायाचा उदय असल्याने चारित्रमोहजनित मूर्च्छा असते. स्त्री-पुत्र-मित्र इत्यादी संबंधित राग असतो, पण साधूंना अशी मूर्च्छा असत नाही.

साधूंच्या जवळ एखादे शास्त्र असेल आणि एखादा श्रावक ठेवून ते शास्त्र घेऊन जात असेल तर साधू त्याला अडवत नाही. हे माझे पुस्तक आहे, मी देणार नाही असा विचार सुद्धा ते करीत नाहीत. साधू ध्यान करीत असतील आणि जर कोणी पिंछी कमंडलू उचलून घेऊन गेले तर साधू काही बोलत नाहीत. ते आपल्या ध्यानातच लीन राहतात.

**२) आरंभरहित**

मुनिराजांच्या मनामध्ये इतका दयाभाव असतो की कोणत्याही जीवाचा घात करणे किंवा कोणाचेही मन दुखावणे इत्यादी पीडा देणे रूप परिणामच होत नाहीत. त्रस व स्थावर या दोन्ही प्रकारच्या जीवांच्या हिंसेचा मन-वचन-काय व कृत-करीत-अनुमोदनेने त्याग करतात. त्यामुळे कोणताही आरंभरूप परिणाम होत नाही. शेती करणे, व्यापार करणे, स्वयंपाक करणे इत्यादी आरंभ स्वतः तर करीत नाहीत. तसेच दुसऱ्यांना करण्यासाठी प्रेरणा सुद्धा देत नाहीत. मंदिर बांधणे, धर्मशाळा बांधणे, दवाखाना काढणे हे कार्य सुद्धा साधूंचे नसते. गृहस्थांचे कर्तव्य सांगताना गृहस्थाला मंदिर इत्यादी बांधण्याचा उपदेश करू शकतात, परंतु स्वतः आरंभ करीत नाहीत. स्वतःसाठी केलेल्या उद्दिष्ट आहाराचे पण ते त्यागी असतात. कारण आपल्यासाठी आहार केला असेल तर त्या आरंभामध्ये जे हिंसादी दोष होतात. त्याचे पाप साधूंना पण लागते, म्हणून ते औद्देशिक आहाराचा त्याग करतात.

**३) उपयोगशुद्धी**

शुद्धोपयोग हाच वास्तविक मुनिधर्म आहे. शुद्धोपयोगात राहण्यासाठी सर्व आरंभ परिग्रहाचा त्याग करून एक सामायिक संयमाची प्रतिज्ञा स्वीकार करतात. त्यांना केवळ एका शुद्धोपयोगात राहण्याची इच्छा असते, परंतु जास्त काळ शुद्धोपयोगात राहू शकत नाहीत, म्हणून शुद्धोपयोग उपयुक्त वाटतो. तेथे आपले परिणाम विशुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करतात. आत्मारूपी वस्त्र कषायरूपी मलाने मलीन होते, म्हणून त्याला स्वच्छ करण्यासाठी स्वाध्याय, ध्यान, आत्मचिंतन, धर्मोपदेश इत्यादी कार्यात आपला उपयोग लावतात. भेदज्ञानरूपी साबण वापरून समतारूपी पाण्याने आत्मारूपी वस्त्राला सदैव स्वच्छ ठेवण्याचा उद्योग करतात. परद्रव्याच्या संयोगाने उपयोग मलिन होतात, म्हणून निर्जन एकांत ठिकाणी जाऊन आत्मसाधना करतात. येन केन प्रकारेण माझा उपयोग विशुद्ध कसा राहील यासाठीच प्रयत्नशील असतात. कविवर्य वृंदावनदासजी २४ तीर्थंकर पूजेमध्ये पाण्याला मुनींच्या मनाची उपमा देतात..

**मुनि मनसम उज्ज्वल नीर प्रासूक गंध भरा।**

मुनिराजांचे मन पाण्यासारखे असते असे न म्हणता, पाणी मुनिराजांच्या मनासमान निर्मळ असते असे म्हटले आहे. यावरून मुनिराजांच्या परिणामांची निर्मळता लक्षात येते.

मुनिराज बुद्धिपूर्वक अशुभ उपयोगाचा तर त्यागच करतात. शुभोपयोगासह शुद्धोपयोगामध्ये सदैव लीन राहण्याचा पुरुषार्थ करतात. कधी उपयोगात कलुषता आली तर आपल्या दीक्षेच्या वेळेच्या विशुद्ध परिणामांची आठवण करतात. सतत भेदज्ञानाची धारा प्रवाहित असते.

**४) योगशुद्धी**

उपयोगाच्या विशुद्धीने त्यांचे मन-वचन-काय देखील शुद्ध असते अर्थात मन अशुभचिंतनात लावत नाहीत. नेहमी संसार, शरीर व भोगापासून विरक्त होऊन बारा भावनांच्या चिंतनात शास्त्राच्या सूक्ष्म विचारांमध्ये सर्व प्राणीमात्राविषयी समता भाव ठेवण्यात आपल्या मनाचा उपयोग करतात. कठोर, कर्कश, अप्रिय वचनांचा त्याग करून हित-मित-प्रिय बोलण्यातच वचनाचा उपयोग करतात किंवा मौन राहतात. ईर्यापथसमिती, एषणासमिती, प्रतिष्ठापना समितीचे प्रयत्नपूर्वक पालन करून कायशुद्धी ठेवतात. मन-वचन-काय गुप्तीमध्ये गुप्त राहून योगशुद्धी ठेवण्यात तत्पर असतात. आपल्या मन-वचन-कायेच्या प्रवृत्तीमुळे कोणत्याही जीवाला पीडा होऊ नये, यासाठी सावधानता बाळगतात. कोणी उपसर्ग केला तरी शांत परिणामाने सहन करतात. पण त्याला हटवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. आपल्या आत्मस्वभावामध्ये लीन होऊन भूक, तहान, शीत, उष्ण इत्यादी परिषहावर सहज विजय मिळवतात. ज्याच्याकडे पूर्वी युद्धामध्ये बलिष्ठ प्राण्यांना सुद्धा सहज जिंकण्याचे सामर्थ्य होते, ते डास मच्छर इत्यादी शूद्र जंतूंना दूर करू शकत नाहीत काय? परंतु आता त्यांचे परिणाम इतके विशुद्ध झालेले असतात की त्या शूद्र जंतूंना हटवण्याचा देखील भाव होत नाही. निरंतर निर्विकल्प समाधीमध्ये स्थित होऊन परिषहविजयी बनतात.

**५) परापेक्षारहितपणा**

मुनिराज इतके निःस्पृह असतात की त्यांच्या अंतरंगात किंचित ही पराची अपेक्षा असत नाही. निरपेक्ष वृत्ती सहजतेने असते. कोणी श्रावक माझ्याजवळ येत नाहीत. माझी विचारपूस करीत नाहीत. माझी सेवा सुश्रुषा करीत नाहीत, असा विकल्प सुद्धा त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाही. उलट जनसंपर्क नको यासाठी ते प्रयत्नशील असतात. पूर्णपणे स्वाधीन असतात, स्वावलंबी बनण्यासाठी तर ते मुनी बनलेले असतात. पूर्ण स्वाधीन वृत्ती म्हणजेच मुनिपणा होय.

हे अंतरंग व बहिरंग लक्षण जिनेन्द्र भगवंतांनी सांगितलेले आहे व ते स्वतः अशा गुणांनी युक्त अरहंत पद प्राप्त केलेले असतात. म्हणून ते खरे जैन होत. यासाठीच मुनिदीक्षेलाही जैनेश्वरी दीक्षा म्हणून गौरवाने उल्लेख करतात.

( पुढे पा. नं. १६ वर)

# योगसार चिंतन

(पुष्प १३)

– **प्रियदर्शन जैन**

**जाम ण भावहु जीव, तुहुँ णिम्मल अप्पसहाउ।**
**ताम ण लब्भइ सिवगमणु, अहीं भावहु तहिं जाउ।२७।**

**जो तइलोयहं झेउ जिणु, सो अप्पा णिरु वुत्तु।**
**णिच्छयणइ एमइ भणिउ, एहउ जाणि णिभंतु।।२८।।**

**अर्थ–** हे जीवराज! जोपर्यंत निर्मल शुद्ध अशा आत्म्याची अनुभूती होत नाही, तोवर तुला मोक्षाची प्राप्ती होणार नाही. उलट तुला निरंतर भवभ्रमंतीच करावी लागेल. ।।२७।।

**अर्थ–** तिन्ही लोकातील जीवांचे द्वारा जो ध्यान करण्यायोग्य जिन आहे, तो एकमेव आपला आत्माच आहे, हे निश्चयाचे कथन आहे. या कथनाचा तू नि:संशयपणे स्वीकार कर.।।२८।।

**२७)आचार्यदेव म्हणतात–**

'हे जीवराज! जोपर्यंत तू आपल्या निर्मळ आत्मस्वभावाची रुची करणार नाही, त्याचे श्रद्धान करणार नाही, तोपर्यंत त्याशिवाय केलेल्या बाह्य क्रिया जसे– व्रत, पूजा, भक्ती, दान इ. प्रयोजनभूत ठरणार नाहीत. त्याकरिता मिथ्यात्वरूपी प्रबळ शत्रूचा नाश करणे आवश्यक आहे. कषाय आणि राग–द्वेषादिक प्रवृत्तींचा जनक मिथ्यात्व भावच आहे.

स्वतत्त्वाचा वास्तविक परिचयच कार्यकारी आहे.....तो झाल्यावरच भेदविज्ञान प्रगट होते आणि त्यामुळे स्व–पराचा यथार्थ निर्णय होतो. परवस्तूत आनंद शोधण्याचा प्रयत्नच दुःखरूप आहे याची जाणीव होते. वास्तविक पाहता परवस्तू या राग–द्वेष उत्पन्न करीत नाहीत. त्यांचे प्रति असणारे आपले ममत्व किंवा आसक्ती यास कारणीभूत असते.'

'आत्मध्यान सोडून अन्य विकल्प तर हा जीव अनादिकाळापासून करीतच आला आहे. त्यामुळेच भवभ्रमण निरंतर सुरू आहे.....जर मुक्ती प्राप्तीची इच्छा असेल तर आपल्या स्वभावात एकाग्रता कर, त्याचीच श्रद्धा कर'– असे आचार्यदेव सांगत आहेत.

जिनेंद्र परमात्मा सांगतात– 'प्रत्येक द्रव्याची स्वतःची अशी पूर्ण सुचारु व्यवस्था असते.... तिथे पराची काहीच आवश्यकता नाही.... प्रत्येक द्रव्यातील सारेच गुण आपआपले काम स्वतंत्रपणे करीत असतात....ते सुद्धा एकमेकांवर विसंबून राहत नाहीत! यापेक्षा निरपेक्षता आणखी कोणती असू शकते?'

आपणही एक जीवद्रव्य आहोत.... स्वतःला जाणण्याशिवाय अन्य कोणतेच कार्य श्रेयस्कर नाही..... परंतु खेदाची गोष्ट ही की, हा जीव अज्ञानी अवस्थेत खोट्या मिथ्या भावांनी प्रेरित होऊन कर्तृत्व भावाचे पोषण करतो आणि सतत आर्त–रौद्र ध्यान करून पीडित होतो.

ज्ञानी सम्यग्दृष्टी जीवास भूमिकेनुसार साऱ्या क्रिया करीत असतानासुद्धा सतत आपल्या स्वभावाची प्रतीती असते.जर ध्यान, दान, स्वाध्याय, संयम, पूजा आदि करीत असताना आपली परिणती स्वभावरूपाने अंतर्मुख परिणमित न होता, विभावरूप परिणमित होऊन बहिर्मुख होत असेल तर.....तर या सर्व क्रियांना काहीच अर्थ उरणार नाही!

आचार्य देव येथे सांगू इच्छितात.–

'आपल्या निज ज्ञान-आनंदरूपी स्वभावाच्या प्राप्तीकरिता सर्वप्रथम सम्यक् आगम अभ्यासाच्या द्वारे मिथ्यात्वाचा नाश करावा लागतो..तदनंतरच कषाय कृश होऊ लागतात. कषाय म्हणजेच राग-द्वेष! यांच्या उत्पत्तीचे कारण कोणते? तर, अज्ञान आणि शरीर व कर्मव्यवस्थेसंबंधी इष्ट-अनिष्ट कल्पना हे आहे.

आपल्या स्वरूपाची खरी ओळख जर झाली, तरच मिथ्या मान्यता लयास पावतील. सर्वप्रथम खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या माध्यमातून हा निर्णय करावा लागेल की, 'मी या शरीरापासून भिन्न एक चैतन्यतत्त्व आहे..... माझ्या पर्यायात होणारे रागादिभाव, ज्यांच्या निमित्ताने मी सुखी-दुःखी होतो, ते माझा स्वभाव नाहीत....ते तर विकारी भाव आहेत.....अनित्य आणि नाशवान आहेत'... हे सत्य अवगत झाल्यानंतरच हा जीव शरीर आणि समस्त परद्रव्यांपासून भिन्न अशा आपल्या ज्ञाता-द्रष्टारूपी स्वभावाचा अनुभव करू शकतो आणि यालाच तर सम्यग्दर्शन म्हणतात! जेव्हा या सत्याचा निर्णय होतो, तेव्हाच राग-द्वेषाच्या नाशाच्या वास्तविक पुरुषार्थाची सुरुवात होते.

२८) धर्मोपदेश किंवा तत्त्वोपदेश हा कधी बहिरंग दृष्टिकोनातून तर कधी अंतरंग दृष्टिकोनातून दिला जातो..त्याचे कथन सापेक्ष असते.... संदर्भानुसार कोण्या एका दृष्टीला मुख्य केले जाते.....या ठिकाणी आचार्यदेव अंतरंग दृष्टिकोनातून कथन करीत आहेत.

अज्ञानी जीव एकाच पक्षाला सत्य समजून दुसऱ्या पक्षाला मिथ्या मानतात..... तर ज्ञानी जीव दोन्हींमध्ये मेळ साधतात....त्यांचे बहिरंग जीवनात चरणानुयोग तर अंतरंगात अध्यात्म, असा दोन्हींचा सुमेळ असतो.. दोहोंच्या एकतेचे नावच मोक्षमार्ग आहे.

भूमिकेनुसार व्यवहारामध्ये भगवंताचे वंदन, नामस्मरण, पूजा, भक्ती आदि शुभ क्रिया या तर होणारच, परन्तु निश्चयाने तर आपला आत्मदेवच ध्यान करण्यास इष्ट आहे, याची सतत जाणीव असू द्यावी. जर हा आत्मदेव त्रिलोकातील सर्व पूज्य पुरुषांना पूज्य आहे, तर मग आपल्याला का नसावा? भगवंत, गणधर, मुनिराज, सम्यग्दृष्टी ज्ञानी जीव सुद्धा आपल्या आत्मदेवाचेच ध्यान करतात. त्यांनी आपणास मार्ग दाखविला, म्हणून भूमिकेनुसार व्यवहाराने हे सर्व पूज्य आहेत, परंतु मार्गक्रमण करून जे साध्य आपल्यास गाठावयाचे आहे, त्यासाठी आपला आत्मदेवच परमार्थाने ध्यान करण्यायोग्य असून पूज्य आहे..

यावरून हेच स्पष्ट होते की, ज्यास आत्मदृष्टी आलेली नाही, त्याचे सर्व क्रिया-कलाप निरर्थक असतात. आत्मज्ञानाने रहित अज्ञानी जीव कदाचित तपामुळे जरी स्वर्गात गेला तरी, तेथून येऊन एकेंद्रिय आदि योनी प्राप्त करून पुन्हा-पुन्हा संसारसागरात भ्रमण करतो, हे जिनेंद्र वचन आहे. म्हणूनच परमार्थाने सतत आपला आत्मदेव आपल्या दृष्टीत ठेवावा आणि ज्ञानधारेत त्याचेच श्रद्धान करावे, ध्यान करावे.

आचार्यदेव सांगू इच्छितात.- 'आता तरी वेळ व्यर्थ दवडू नकोस... चुकलास तर पुन्हा अनंत काळापर्यंत या संसारसागरात परिभ्रमण करावे लागेल. या अवस्थेतही तुझ्यात इतकी शक्ती आहे की, तू स्वतःला भगवान आत्मा पाहू शकतोस.... डोळ्यांनी नाही-इंद्रियांनी नाही तर, तू स्वतःच स्वतःचा म्हणजेच आपल्या चैतन्य चमत्काराचा अनुभव घेऊ शकतोस.

धर्म म्हणजे असे नाही की, आज करा-फळ पुढे मिळेल.... धर्मरूप तर तू आताच होऊ शकतोस.. जर झालास तर शांतीचे वेदन तुला याच क्षणी होईल..... कारण धर्म तुझ्या अंतरंगी आतच विद्यमान आहे.. अंत:चक्षू उघडून तर पाहा.. अथांग ज्ञानरूपी समुद्र तुला सतत अवगाहन करण्याकरिता आमंत्रण देत आहे! मग वेळ कशासाठी?..... मार त्यात डुबकी आणि घे अनुभव आपल्या भगवद्स्वरूपी आत्म्याचा, जो परमार्थाने आताच तीन लोक प्रमाण, असंख्यात प्रदेशी, सर्व

कर्मविमुक्त, परमपारणामिक ज्ञानरूपी अखंड पिंड आहे...!!

आचार्य जणू सांगू इच्छितात.-'हे जीवा! अत्यंत दुर्लभतेने तुला हा जिनधर्म मिळाला आहे. हे तत्त्वज्ञान तुला मिळाले आहे.. त्यास व्यर्थ न जाऊ देता परम तत्त्वाची प्राप्ती करण्याचा उद्यम कर. स्वतःला स्वतःमध्येच शोध....हाच खरा पुरुषार्थ आहे! याचेच फलस्वरूप तुला स्वानुभूतीची प्राप्ती होईल....रत्नत्रय प्रगट होईल....हाच वास्तविक मोक्षमार्ग आहे..देवांचा ही देव तुझ्यात विराजमान आहे.. त्याला शोध...तुला तो प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही!' अशा या निजात्मदेवाच्या प्राप्तीचा मार्ग येथे आचार्यदेव प्रशस्त करीत आहेत..

खरोखर जीवनात गुरुंचे किती महत्त्व आहे, हेच या चिंतामणीरूपी ग्रंथावरून सिद्ध होते. कारण गुरु म्हणजे सचेतन शास्त्रच! समस्त संतापाला हरणारे मुनिराज योगेंदुदेव निमित्तरूपाने, आपल्या वचनरूपी शीतल जलाने आजही आपल्यासारख्या असंख्य जीवांच्या तृष्णेचे शमन करीत आहेत.... सम्यग्दर्शन प्राप्त करण्याचा मार्ग दाखवीत आहेत. परंतु हे देखील तितकेच खरे की, मार्गक्रमण तर आपल्यालाच करावे लागणार.. त्याशिवाय तरणोपाय नाही.. अन्य कुठलाच रस्ता नाही..!

(क्रमशः)

## प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

( पा. नं. १३ वरून)

हे मुनिलिंगच मोक्षाचे कारण आहे. अन्य कोणत्या वेशाने मोक्ष मिळत नाही. म्हणून यास अपुनर्भवकारण असे म्हणतात. म्हणजे जेथे अपुनर्भव अर्थात जन्म नाही, असे ते मोक्ष होय.

निश्चयाने द्रव्यलिंग मोक्षाचे कारण नाही. द्रव्य लिंग शरीराश्रित असल्याने परद्रव्यच आहे. दर्शन-ज्ञान-चारित्र (भावलिंगच) मोक्षमार्ग आहे. तो आत्म्याचा भाव आहे, म्हणून समयसारमध्ये आचार्य कुंदकुंद देव म्हणतात..

**ण दु होदि मोक्खमग्गो लिंगं जं देहणिम्ममा अरिहा।**
**लिंगं मुइत्तु दसणणाणचरित्ताणि सेवंति ।।४०९।।**

लिंग मोक्षमार्ग नाही, कारण अरहंतदेव शरीराप्रती निर्मम होऊन लिंगाला सोडून दर्शन-ज्ञान-चारित्राचे सेवन करतात. जर देहमय द्रव्यलिंग मोक्षाचे कारण असते तर अरहंतदेव देहाचे ममत्व सोडून दर्शन-ज्ञान-चारित्राचे सेवन का करतात? द्रव्यलिंगानेच मोक्ष प्राप्त केले असता यावरून हे निश्चित होते की देहमय द्रव्यलिंग मोक्षमार्ग नाही तर दर्शन-ज्ञान-चरित्र रूप आत्माच मोक्षमार्ग आहे.

द्रव्यलिंगाशिवाय मोक्ष होत नाही, पण द्रव्यलिंगानेच मोक्ष होत नाही. त्यासाठी भावलिंगसहित द्रव्यलिंग आवश्यक आहे.

( क्रमशः )

## भावपूर्ण श्रद्धांजली..!!



प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांचे परम शिष्य व निःसीम भक्त, गुरुदेवांचे आरोग्य सल्लागार, गुरुकुल स्नातक

**डॉ. पी. डी. पाटील**

(माणगावकर डॉक्टर, नाना डॉक्टर, चित्तरंजन डॉक्टर) (श्री. गोमटेश बेडगे सर यांचे सासरे)

यांचे सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी वयाच्या ९३व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभो व कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती परमात्मा प्रदान करो, ही विनम्र प्रार्थना...!!

# अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह

## (भाग ३)

**Discussion on Jainism Whatsapp Group**

**१७. अनंतानुबंधी लोभ किसे कहते है?**

अपनी स्वभावपर्याय(सम्यग्दर्शनादि) प्रकट करूँ, तभी वास्तविक संतोष है – ऐसा न मानकर अशुभ से शुभ राग में संतुष्ट होकर अटक जाना यह राग का लोभ है और इसी को अनंतानुबंधी लोभ कहते है। अर्थात मान्यता में राग में सुख की कल्पना के निमित्त से चरित्र में अनंतानुबंधी लोभ पाया जाता है। अथवा इस विश्व में मेरे लिए कोई भी अस्तित्व इष्ट नहीं है (निश्चय से और व्यवहार से एकमात्र वीतरागता इष्ट है), ऐसी श्रद्धा के अभाव के निमित्त से जो लोभ (किसी कल्पित इष्ट को और अधिक पाने की चाह) उत्पन्न होता है, उसे अनंतानुबंधी लोभ कहते है।

**१८. क्या नो–कषाय में भी अनंतानुबंधी पाए जाते है?**

नहीं, नो–कषाय में अनंतानुबंधिआदि भेदों का शास्त्रों में उल्लेख नहीं मिलता, अपितु सर्वत्र इनका मुख्य कषायों (क्रोध, मान, माया और लोभ) के साथ ही उल्लेख मिलता है।

**१९. क्या अनंतानुबंधी कषाय में तीव्र/मंद भेद पाए जाते हैं?**

हाँ, अनंतानुबंधी कषाय में तीव्र/मंद भेद पाए जाते हैं।

**२०. लेकिन आपने दिए हुए मोक्षमार्ग प्रकाशक के सन्दर्भ में तो लिखा है की 'इन्ही प्रकृतियों के तीव्र अनुभाग उदय होने पर तीव्र क्रोधादिक होते है...। हमें यह असमंजस है की तीव्र अनंतानुबंधी के उदय में तीव्र क्रोध (लेश्यारूप वर्गीकरण) कैसे हो सकता है?**

पंडित टोडरमलजी ने जो लिखा है, 'इन्हीं प्रकृतियों के तीव्र अनुभाग उदय होने पर तीव्र क्रोधादिक होते है', इसका अर्थ 'इन्हीं प्रकृतियों के तीव्र अनुभाग उदय होने पर तीव्र अनंतानुबंधी क्रोधादिक होते है...।' ऐसा लेना। क्योंकि उन्होंने स्वयं कहा है की अनंतानुबंधीआदि का सम्बन्ध तीव्र/मंद कषाय से नहीं है।

इससे यह अर्थ निकलता है की 'इन्हीं प्रकृतियों के तीव्र अनुभाग उदय होने पर तीव्र अनंतानुबंधी क्रोधादिक होते है...।'

**२१. लेश्या के आधार पर किए गए तीव्र/मंद भेद और अनंतानुबंधी के तीव्र/मंद भेद में क्या अंतर है?**

भेद जानने से पहले ये समझ ले की ये, एक ही चारित्र गुण की विकारी पर्याय को देखने के दो अलग नजरिये हैं। प्रायः कषायों को लेश्याओं के आधार से तीव्र/मंद की भाषा में ही समझाया जाता है क्यूंकि ये तीव्रता/मंदता हमारी पकड़ में आती है। लेश्याओं के आधार से कृष्ण, नील, और कापोत (उतरते क्रम में तीव्र कषाय/अशुभ परिणाम) और पीत, पद्म और शुक्ल (चढ़ते क्रम में मंद कषाय) यह वर्गीकरण अशुभ और शुभ परिणामों की अपेक्षा है। परन्तु सातवे नरक वाला जीव भी सम्यक्त्व प्राप्त कर सकता है। इस बात को हम सभी जानते है। सातवे नारकी जीवों में नियम से कृष्ण लेश्या रूप तीव्र कषाय परिणाम ही पाए जाते है। इसका मतलब है की कृष्ण लेश्या रूप तीव्र कषाय परिणामों में भी अनंतानुबंधी का अभाव हो सकता है क्योंकि अनंतानुबंधिआदि भेद तीव्र/मंद अनुसार नहीं है, अपितु सम्यक्त्वादि का घात करने के आधार से है। इससे यह बात निकलती है की कृष्ण लेश्यारूप कषाय परिणामी जीव भी अपने अभिप्राय को सुधार सकता है और ऐसे निमित्त के चलते अनंतानुबंधी कषाय को मंद करते हुए स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र प्राप्त कर सकता है। इसके

विपरीत, लेश्यानुसार अत्यंत मंद कषायरूप परिणाम तीव्र अनंतानुबंधी हो सकते है अगर मान्यताओं में महा विपरीत तत्त्वार्थ श्रद्धान हो तो; जिसके रहते सम्यक्त्व अर्थात् स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र की प्राप्ति अत्यंत दुरापास्त हो जाती है।

इसका अर्थ कतई ये नहीं की लेश्यानुसार तीव्र कषायी बनें, तीव्र कषाय से मंद कषायरूप प्रवर्तनाही अच्छी बात है। लेकिन साथ ही में अनंतानुबंधी का स्वरूप भली-भाँती जानकार उन्हें मिटाने का प्रयत्न करें

**२२. प्रथमोपशम सम्यक्त्व के काल में अनंतानुबंधी कर्म की क्या अवस्था बनती है ?**

प्रथमोपशम सम्यक्त्व के काल में अनंतानुबंधी कर्म सदवस्था रूप उपशम को प्राप्त होते है। इसका मतलब ये है की जीव जब तक सम्यक्त्व प्राप्त कर ले तब तक अनंतानुबंधी कर्म सत्ता में तो रहते है, लेकिन उनका उदय नहीं होता, उनका उपशम होता है। अनंतानुबंधी कर्मों की निषेक एक एक समय पहले अप्रत्याख्यानादि में संक्रमित होते है। इस वजह से वे उदय में नहीं आते, मात्र सत्ता में रहते है। उनका अंतरकरण नहीं होता।

**२३. द्रव्यलिंगी की अनंतानुबंधी कषाय की परिस्थिति क्या होती है ?**

प्रथम ये मानले की द्रव्यलिंगी मतलब हमारी स्वयं की पूर्व भवों में अनेक बार धारण की हुई अवस्था, हमने पूर्व में अनेक बार महाव्रत धारण करके उनका निरतिचार पालन करते हुए अंतिम ग्रैवेयक (स्वर्ग) हासिल किया है। लेकिन अनुचित पुरुषार्थ के चलते मिथ्यादृष्टि बने रहें हमारी द्रव्यलिंगी की अवस्था का वर्णन करते हुए पंडित टोडरमलजी ने लिखा है - 'द्रव्यलिंगी को सर्व घातिकर्मों का बंध बहुत स्थिति-अनुभाग सहित होता है।' यह वर्णन अव्रती और व्रती सम्यग्दृष्टि की तुलना में है। इसका मतलब है की भले ही बाहरसे नग्न दिगंबर भेस धारण करके २८ मूल-गुणों का प्रामाणिक पालन करते रहे फिर भी अनंतानुबंधी कषाय का उदय नित्य रहता ही रहा। जिसके निमित्त से स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र भी हासिल नहीं कर सके और नवीन अनंतानुबंधी कर्मों को बांधते रहे है (मिथ्यात्व और अनंतानुबंधी दोनों पाए जाते है)। इससे हमें ये सीखना है की पुरुषार्थ सही दिशा में होना अत्यंत आवश्यक है, वरना मिथ्यात्व से छुटकारा नहीं मिलेगा।

करणानुयोग की अपेक्षा अविरत सम्यक्त्व (४था गुणस्थान) होने के बावजूद जब तक बारह कषाय (अनंतानुबंधी व्यतिरिक्त) का जब तक सद्भाव है तब तक द्रव्यलिंगी होता है। मगर अनंतानुबंधी के अभाव में श्रद्धा और चारित्र मिथ्या नहीं होता। इसी तरह व्रती श्रावक (५वा गुणस्थान) होने के बावजूद जब तक आठ कषाय (प्रत्याख्यान और संज्वलन) का सद्भाव है तब तक द्रव्यलिंगी होता है। मगर अनंतानुबंधी और अप्रत्याख्यान के अभाव में श्रद्धा और चारित्र मिथ्या नहीं होते।

**प्रेषक- प्रो. डॉ. शिरीष रायबागकर,**
अहिल्यानगर, मोबा. ९९६०३७९०४७

**(क्रमशः)**

## विनम्र निवेदन

**१) भद्रायण -** गुरुदेव समंतभद्र महाराज यांचे मुलांसाठी व संक्षिप्त रुचीवाल्या श्रावकांसाठी १८८ पानांचे पुस्तक आता अनुपलब्ध आहे. एका वर्षात याच्या सर्व प्रती संपल्या आहेत. अत्यंत उपयुक्त व रोचक असे हे पुस्तक आहे. त्याची दुसरी आवृत्ती छापली जात आहे.

**२) गुरुकुल पूजापाठ -** हे पूजनाचे पुस्तक खास करून गुरुकुलातील मुलांसाठी नित्य पूजन करता यावे यासाठी छापले जात आहे. दोन वर्षापूर्वी १००० प्रती छापल्या होत्या. आता याची ही दुसरी आवृत्ती छापली जात आहे.

**या पुस्तकांना दानराशी देऊन सहकार्य करावे.**

**संपर्क :** श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, मोबा. नं. ९०४९४ ७३४३४

# 'सोलहकारण भावना भाय....!'

(लेखांक १४)

**हर्षा वेखंडे, नागपूर,** ९८२२६९०८६०

**प्रवचनभक्ती भावना – (भाग १)**

संवेग, सक्षम आणि शारदा आजींनी जयपूरच्या मुलतान मंदिरात प्रवेश केला. भगवंतांच्या प्रतिमांसमोर मुलं नतमस्तक झाली. अगदी बाजूला असलेल्या, छतापासून खाली येणाऱ्या मोठमोठ्या कपाटांमध्ये नीटनेटक्या वेष्टनांमध्ये अनेक ग्रंथ बांधून ठेवलेले होते.

'आजी, या मंदिरचं नाव मुलतान मंदिर असे का बरे आहे?'–संवेगची जिज्ञासा त्याला शांत बसू देईना.

आजी म्हणाल्या, 'संवेग, आपण सोलहकारण भावनांचा स्वाध्याय करीत आहोत ना... त्यातली तेरावी भावना आहे, प्रवचनभक्ती भावना! या मुलतान मंदिराचा इतिहास म्हणजे प्रवचन भक्तीचं उज्ज्वल उदाहरणच आहे!

मुलांनो, सन १९४७मध्ये भारत–पाकिस्तान फाळणी झाली. फाळणीच्या वेळी झालेल्या हिंदू– मुसलमानांच्या दंग्यांनी देश हादरून गेला. त्या साऱ्या घटना वर्तमानपत्रे, मासिके, चित्रपट, नाटक या दृक्‌श्राव्य माध्यमांमार्फत जनमानसापर्यंत पोहोचल्या. त्याने साऱ्या भारतवासीयांची मनं रक्तबंबाळ झाली. या हृदयद्रावक पार्श्वभूमीवर मन अभिमानाने ओथंबून येईल अशी एक घटना घडली.

पूर्वी भारत एकसंध होता. आज पाकिस्तानात असलेला पंजाब आणि सिंधचा काही भाग पूर्वी भारताचं अंग होता. त्या पंजाब आणि सिंध भागात मोठ्या प्रमाणात जैन व्यापारी राहायचे. जिथे जैन समुदाय राहतो, तिथे नियमाने मंदिरं असतात! तेथेही सुंदर मंदिरं होती जैनांची.... त्यात अनेक धार्मिक ग्रंथांची प्राचीन हस्तलिखितंही होती. फाळणी झाली आणि पंजाब–सिंधचा तो भाग पाकिस्तानात गेला.... हिंसेचा डोंब उसळला.... पिढ्यानुपिढ्या तिथे राहणाऱ्या रहिवाशांना चिंतेने घेरले.... असुरक्षितता आणि येऊ घातलेल्या संकटांची भीती जैन घरांमध्येही दाटली.

भारतातून या परिवारांना आणण्यासाठी विमान पाठवण्याची व्यवस्था केली गेली. सारा जमीनजुमला, घरदार... सारं सारं सोडून जैन समुदाय विमानतळावर जमला. पण उड्डाण घेण्यासाठी पायलटने नकार दिला, कारण सामानाचं वजन जास्त झालं.....! 'एवढी जड फ्लाईट मी उडवू शकणार नाही...!'– पायलट म्हणाला. काय असावं त्या सामानात प्रामुख्याने?

तर त्यात होत्या जिनप्रतिमा आणि हस्तलिखित शास्त्र भांडार! सोनं–चांदी, जमीन, घर...सारं सारं मागे सोडून लोक आले होते. पण धर्म पताका म्हणजे जिनेंद्र भगवंतांच्या मूर्त्या आणि शास्त्र भांडार सोबत घेण्यात आले होते.

चर्चा झाली आणि जैन लोकांनी निर्णय घेतला, म्हणाले– 'आम्हाला नका नेऊ, पण आमची ही धर्मसंपत्ती घेऊन जा! आम्ही मरण पत्करू, पण धर्माची अवहेलना होऊ देणार नाही. लेखणीत बांधली गेलेली ही भगवंताची वाणी म्हणजे प्रवचन अर्थात आगम आमचे आराध्य आहे. ती सुरक्षित ठेवणे, आमचे प्रथम कर्तव्य आहे!'

पायलट भारावला...त्याने हिंमत बांधली आणि विमान उडवलं. ते भारताच्या भूमीवर सुखरूप उतरलं. त्या वैमानिकाचे उद्गार कागदावर कायमस्वरूपी लिहिले गेले. त्याने लिहिलं होतं–

'हे माझ्या आयुष्यातील सर्वात हलकं उड्डाण होतं...!'

मुलतानचे हे लोक पुढे जयपूरमध्ये

स्थिरावले. येथील साधर्मी लोकांनी त्यांना आश्रय दिला. धर्मासाठी मृत्यूच्या दारात जायला तयार झालेला हा समुदाय आज जयपूरमधील धनाढ्य समाज मानला जातो. तेथील आदर्शनगर भागात मध्ये त्यांनी पुढे मंदिर बांधलं. मुलतानहून आणलेल्या जिनप्रतिमा आणि हस्तलिखित ग्रंथ मंदिरात ठेवले गेले. हेच ते मुलतान समाजाचे मंदिर! प्रवचन भक्तीची महिमा अभिमानाने आम्हाला सांगत आहे....अशी असते प्रवचन भक्ती...!'

मुलतान मंदिराच्या या इतिहासाने ऐकणारे सारे भारावून गेले होते. सक्षमच्या डोळ्यात पाणी दाटलं होतं. त्याला बोलणं कठीण झालं. आजींनी ते जाणलं.

त्या पुढे म्हणाल्या,– 'सक्षम! आपण सारे भगवंतांच्या वाणीला आराध्य स्थानी ठेवणारे, पूज्य मानणारे. त्यांच्या वाणीलाच प्रवचन म्हणतात बरं! मी सांगते हो तुम्हाला प्रवचन भक्ती समजावून...

प्रवचनभक्ती भावना ही सोलहकारण भावनांमधील तेरावी भावना होय. आधी प्रवचन भक्ती या शब्दाचा अर्थ बघू या..

'भक्ती' या शब्दाचा अर्थ तर आपल्याला माहिती आहे...भक्ती म्हणजे श्रद्धेने केलेले सारे व्यवहार. पूजन, आदर, सेवाभाव सारं काही सामावून जातं भक्ती या शब्दात आणि भक्ती कोणाप्रति असावी आणि का असावी हे समजावून सांगणारा दुसरा शब्द येतो 'प्रवचन'! प्रवचन हा शब्द आपण सर्वसाधारणपणे मुनिमहाराजांच्या उद्बोधनासाठी वापरत असलो तरी, प्रवचन म्हणजे प्रबुद्धाची वचनं. अर्थात सर्व जाणणाऱ्या सर्वज्ञ वीतरागी जिनेन्द्र भगवंतांद्वारे सांगितले गेलेले आगम.

प्रवचन म्हणा किंवा आगम, भांडार आहे ते....ज्यात सहा द्रव्ये, पाच अस्तिकाय, सात तत्त्वे किंवा नऊ पदार्थांचं वर्णन आहे.

विश्व जणू हातावर ठेवलेल्या आवळ्यासारखं स्पष्ट दिसावं असा ज्ञानरूपी दीपक म्हणजे प्रवचन. विश्वातल्या साऱ्या पदार्थांचं वर्णन, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, जीवाची सुखदुःखं, सुखाच्या मार्गाचं वर्णन या प्रवचनात स्पष्ट केले आहेत. सुखाचा रस्ता कोणाला नको आहे? पण त्या रस्त्याची ओळख नसल्याने जीव भरकटतो संसाराच्या रहाटगाड्यात कायम दुखी राहतो.

प्रवचनभक्ती जीवाला मोह आणि अज्ञानाच्या अंधारातून मुक्त करून सम्यग्दर्शनाचा मार्ग दाखवते, मिथ्या मान्यतांचा नाश करते.'

संवेग म्हणाला,–'बरेच लोक म्हणतात ...कुठे आहे नरक, कुठे आहे स्वर्ग? साऱ्यांची उत्तरं आहेत का प्रवचनात अर्थात आगमात?'

'आहेत तर ! कमरेवर हात ठेवून उभा असलेल्या पुरुषाच्या आकाराचा लोक. त्यात सर्वात वर उर्ध्वलोक, मध्यभागी मध्यलोक आणि मध्य लोकाच्या खाली अधोलोक. अधोलोकाच्या सात पृथ्वी आहेत. नारकींची बिळं, त्यांची मोजमापं, उत्पत्तीची स्थानं, त्यांची आयू, त्यांचे शरीर, वेदना साऱ्यांचं वर्णन केलं आहे. भवनवासी देवांची निवासस्थानेही अधोलोकात आहेत बरं! त्यांची आयू, त्यांचे वैभव, भोग यांचेही वर्णन आगमात आहे.

मध्यलोक म्हणजे मुख्यत्वे मनुष्य आणि तिर्यंचाचा प्रदेश. त्यातही असंख्यात द्वीप–समुद्र आहेत. पर्वत–नद्या–सरोवरे आहेत. कर्मभूमी आहेत, भोगभूमी आहेत. तिर्यंचांची, भवनवासी देवांची निवासस्थाने, कर्मभूमीच्या मनुष्यांचे कार्य, आयू, सुखदुःख या साऱ्यांचं वर्णन आहे.

आणि हो, सूर्य–चंद्र आदि ज्योतिषी देवांची विमानं, त्यांचं वैभव, आयू यांचेही वर्णन आगमात आहे. उर्ध्व लोकातील इंद्रांचं वैभव त्यांची शक्ती, आयू इत्यादींचं वर्णन प्रवचनात आहे.'

'बापरे! किती मोठं आहे हे विश्व... वेगवेगळ्या द्रव्यांनी गजबजलेलं.. ती द्रव्यं, त्यांचं अस्तित्व, त्यांच्या राहण्याचं क्षेत्र, त्यांचा काळ, तसेच त्यांच्या वेगवेगळ्या शक्ती आणि होणारे कार्य... साऱ्यांचं वर्णन आहे प्रवचनात.. हो ना आजी?'– संवेग म्हणाला.

'हो ना! एकूण संपूर्ण तीन लोकांचं वर्णन प्रवचनात केलं आहे.

या तीनही लोकांत संसारी जीवाचं भ्रमण होत असतं. त्याची कारणे सांगितली आहेत. आपल्या भवभ्रमणाची म्हणजेच संसाराची ओळख करून दिली आहे प्रवचनात आणि का करून दिली आहे त्याचंही कारण आहे, बरं का! या संसाराच्या चक्रातून सुटण्याची प्रबळ इच्छा जागृत व्हावी... धडपड व्हावी समजून घेण्याची! सुटण्याच्या उपाय रूपाने सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्ररूपी रत्नांचं वर्णन प्रवचनात आहे.

गृहस्थ अवस्थेत श्रावकाची जघन्य चर्या, मध्यम चर्या, उत्कृष्ट चर्या, श्रावकांची व्रते-संयम साऱ्यांचं सविस्तर कथन प्रवचनात आहे. मुनिराजांचे २८ मूलगुण, ८४ लाख उत्तरगुण, बारा प्रकारचे तप, आहार विहार, समाधिमरण... सगळे वर्णन प्रवचनात आहे.'

'आजी, मोक्षमार्गाचं वर्णन आहे हे तर!' संवेग म्हणाला.

'अगदी बरोबर! पण मोक्षमार्ग समजण्यासाठी आधी संसार मार्ग पण लक्षात घ्यावा लागतो, म्हणून त्याचंदेखील वर्णन केलं आहे प्रवचनात. १४ गुणस्थान, १४ जीवसमास, १४ मार्गणा यांचं स्वरूप प्रवचनातूनच जाणलं जाऊ शकतं.

मुलांनो, बहुश्रुतभक्ती भावनेत आपण द्रव्यश्रुताचे भेद म्हणजे १२ अंग,१४ पूर्व आणि १४ प्रकीर्णकांचं स्वरूप बघितलं... प्रवचनाचे म्हणजे आगमाचे विविध अंग आहेत ते...'

'आजी, बरेच लोक म्हणतात हे सगळं खरं आहे कशावरून? स्वर्ग-नरक आम्हाला दिसत नाही....मग खरं कसं मानायचं? इतके द्वीप-समुद्र आहेत की नाही...कोणास ठाऊक! सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र हाच एक मोक्षमार्ग आहे, दुसरा नाही... हे कोणी सांगितलं? प्रत्येक व्यक्ती कुठला ना कुठला धर्म तर पाळतेच...मग मोक्षमार्ग एकच आहे आणि हाच आहे असं कसं म्हणायचं?..'

'हो ना, कोणी म्हणतात आमचे आजी-आजोबा, आई-वडील जैन परंपरेने सगळं मानत आहेत म्हणून आम्ही मानतो, बाकी आम्हाला तर काही कळत नाही...! मग त्यांच्या मनात आगमाच्या प्रति भक्तीचा भाव येणार कसा?'

'मुलांनो, सर्वात आधी निर्णय करायचा तो देव-शास्त्र आणि गुरुंचा. प्रथम व्हावी दृष्टीची शुद्धी! दर्शनविशुद्धी या पहिल्या भावनेत आपण बघितलं आहे.. सम्यग्दर्शनाचं स्वरूप!! जसं आहे तसं बघावं..' आजी म्हणाल्या.

'आम्ही तर अल्पज्ञ! आम्हाला कसं कळणार?' सक्षमचा आवाज आला.

'कोणाचं ज्ञान कमी, तर कोणाचं जास्त... असं आपण आजूबाजूला व्यवहारातही बघतो. यावरून लक्षात येतं की, ज्ञानाची सर्वोत्कृष्ट अवस्था असते. ती पुरुषार्थाने प्राप्त केली जाऊ शकते..... त्यालाच म्हटलं जातं केवलज्ञान! ज्ञानाची अशी अवस्था प्रकट होते आणि ज्यांची ही अवस्था प्रकट होते त्यांना आम्ही देव मानतो. प्रथम श्रद्धान व्हावं ते या अवस्थेचं आणि ती प्रकट करणाऱ्या देवांचं! केवलज्ञानात संपूर्ण विश्व झळकतं, जाणलं जातं. पुरुषार्थी जीव आपल्या शुद्ध स्वरूपाचा निर्णय करून आत्मस्वरूपाच्या ध्यानात मग्न होतात, परम वीतरागी होतात आणि आश्चर्य घटित होतं.... सर्वज्ञता प्रगट होते. ते आहे परिपूर्ण विकसित ज्ञान! विश्वातील संपूर्ण पदार्थांच्या भूतकाळातील, वर्तमान काळातील, भविष्यकाळातील अवस्था युगपत् आणि वर्तमानवत् जाणल्या जातात. अशा अवस्थेला प्राप्त झालेल्या जीवांपैकी तीर्थंकरांची वाणी खिरते. शब्द रूपाने प्रगटते. ती प्रबुद्धाची वचनं अर्थात प्रवचन. आम्हाला लाभलेली सर्वात मोठी निधी! त्या प्रवचनाच्या आधारे आपण आपल्या स्वरूपाचा निर्णय करू शकतो.... दुःखाचे कारण समजून घेऊ शकतो.... सुखाच्या रस्त्याकडे वळू शकतो.'-आजींनी उत्तर दिलं.


'पण आजी, महावीर भगवंतांची वाणी खिरून तर अडीच हजार वर्षांवर काळ लोटून गेला.

त्या वेळचे शब्द आम्हाला आज उपलब्ध आहेत का, की त्यांना प्रमाण मानून आम्ही प्रवचन भक्ती करावी... त्या वाणीसमोर नतमस्तक व्हावे..?'- संवेग आणि आजींची चर्चा रंगली.

'मुलांनो, भगवान महावीरानंतर कोणी आणि कशा प्रकारे ही प्रवचन निधी आमच्यापर्यंत पोहोचवली, हे नक्कीच जाणून घेऊ या...पण ते उद्या बरं का...! आता जेवणाची वेळ झाली आहे, आपल्याला आपल्या धर्मशाळेत पोहचायला उशीर नको व्हायला! निघू या ना?'

(क्रमशः)

## बाहुबली येथे धर्म संस्कार शिबिर व विधान सानंद संपन्न











श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे प्रत्येक वर्षाप्रमाणे चालू वर्षी देखील दि. २ मे २०२६ ते १० मे २०२६ अखेर धर्म संस्कार शिबिर आणि त्यासोबत भक्तामर विधान याचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २००हून अधिक लोकांनी याचा लाभ घेतला. यासाठी प. पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, प. पू. मुनिश्री १०८ श्री सुयोगसागरजी महाराज, प. पू. मुनिश्री १०८ श्री सहिष्णुसागरजी महाराज, प. पू. आर्यिका १०५ श्री अनुश्रुतमति माताजी, प. पू. आर्यिका १०५श्री शुध्दोऽहंश्री माताजी, प.पू. आर्यिका१०५ श्री संवित्तिश्री माताजी, प.पू. आर्यिका १०५ श्री सुदृष्टिश्री माताजी, प. पू. क्षुल्लक १०५ श्रीसुभद्रसागरजी महाराज, प. पू. क्षुल्लिका १०५ श्री सुधृतिश्री माताजी या मुनिसंघाचे सानिध्य लाभले.

भद्रानंद, छहढाला, प्रबोधसार, समयसार, देवागमस्तोत्र, जैन सिद्धांत प्रवेशिका असे अनेक ग्रंथ शिकविण्यात आले. शेवटी परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले. तसेच दररोज सायंकाळी विविध विद्वानांचे प्रवचन आणि सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होत होते. यासाठी बालब्रह्मचारी श्रीधर मगदूम अण्णा, पंडित श्री सोऽहम् विक्रांत शहा सोलापूर, श्री. बाबगोंडा पाटील, श्री. संतोष मिणचे शास्त्री बोरगाव, श्री. सूरज पाटील शास्त्री इचलकरंजी, श्री. धीरज पाटील शास्त्री कोरोची, श्री. प्रदीप धोतरे शास्त्री वळिवडे, श्री अक्षय चव्हाण शास्त्री आळते, श्री. रोहित सिदनाळे शास्त्री इत्यादी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. नैतिक, मूल्य शिक्षणाबरोबरच विविध शारीरिक खेळही घेण्यात आले.

भक्तामर विधानासाठी विशेष करून आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज आणि आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्री. गोमटेश बेडगे व श्री तात्यासाहेब अथणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्री जयंत भीसीकर यांनी रुपये पंचवीस हजार इतकी दानराशी पाठवली, अशा प्रकारे अनेक दातारांनी सहयोग दिले.

# पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ

(लेखांक – २९)

**विपुल खेडकर,** नागपूर

राज्याचे महत्त्वाचे सर्व सदस्य बाहेर असतांना पट्टमहादेवींच्या हत्येच्या षड्यंत्राची बातमी येऊन धडकली होती....याचे सर्वदूर परिणाम काय होतात, पट्टमहादेवी या परिस्थितीला कशा सामोऱ्या जातात.... ते बघू या भागात !

**हत्येचे षड्यंत्र ?**

गुप्तहेरांनी थेट पट्टमहादेवींना बातमी दिली की–'पट्टमहादेवींच्या हत्येचे षड्यंत्र केवळ रचले गेले नसून, अनेक संशायित राजमहालाच्या आसपास फिरत असलेले दृष्टिपथात आले आहेत ....सध्या त्यांना पकडून चौकशी सुरु आहे.....'

पट्टमहादेवींना हसणे आवरेना ! गुप्तहेरांचा प्रमुख मायण जो त्यांच्या समोर बातमी घेऊन आला होता, तोच अचंब्यात पडला. स्वतःच्या हत्येच्या बातमीवर हसणे.....! त्याने अशा प्रतिक्रियेची कधीच अपेक्षा केली नव्हती .

पट्टमहादेवींनी विचारले, 'मायण, तुम्ही याची सत्यासत्यता स्वतः तपासली कां ? माझ्या प्राणांचा कोण, कशासाठी घात करणार ? क्रोध असेल तरच हत्या होईल ना ? प्रेमभाव आणि बंधुता याने लोकांमधे एकी ठेवायची हे आम्ही आमचे ध्येय ठेवले आहे. कधी कोणाला दुखावण्याचा विचारही आमच्या मनात कधी डोकावला नाही, तर कां लोक आमच्या हत्येवर उतरतील ?'

गुप्तहेर मायण न राहवून म्हणाले, 'या सगळ्या षडयंत्रामागे कोणाचा हात आहे हे तर स्पष्ट लक्षात येते आहे ! तरीदेखील नक्की कोण ?... हे शोधण्यासाठी आम्ही चट्टला आणि चाविमय्यांना तुळुकाडूकडे रवाना केले आहे.'

' आम्हाला न सांगता......?'

' महासन्निधानांचा तसा आदेशच होता की, एकता भंग करणाऱ्यांच्या षड्यंत्रांचा पर्दाफाश करण्यासाठी आम्हाला जे उचित वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य आम्हास आहे...! म्हणून.....'

' तुळूकाडूमधे सध्या छोट्या राणी आणि राजकुमार नरसिंह आहेत. त्यांची सुरक्षा महत्त्वाची आहे. त्यांना ताबडतोब येथे बोलवावे लागेल, म्हणून असा आदेश देऊन तुम्ही घाई केली असे वाटले.....'

'षड्यंत्रकारी आपली सुरक्षा व्यवस्था स्वतः आधीच करतात....!'

'मायण ! तुम्हाला कळतंय् का, तुम्ही काय बोलत आहात ?'

'एक काळ होता की, मी आपल्यासारखाच विचार करीत होतो. परंतु आता सन्निधानांनी दिलेल्या शिक्षणाने मी बदललो आहे. चट्टलाला येऊ द्या... सत्य समोर येईलच...! जर खोटे निघाले तर मी सेवानिवृत्ती घेईन.....!'

' काहीतरीच काय बोलता, मायण..! तुमच्या निष्ठेविषयी काही शंकाच नाही, पण षड्यंत्रकारी घरातलेच आहेत, ही गोष्ट लोकांमधे पसरली तर..तर त्याचे बाहेरच्या राज्यात वाईट परिणाम पसरतील. राज्यात असंतोष पसरेल.. त्यात युद्ध सुरु आहे... परिस्थिती आणखी बिघडेल... म्हणून काळजीपूर्वक काम करावे लागेल..... तेव्हा आपल्या हेरांना परत बोलवून घ्या!'

' मला सन्निधानांचा आदेश आहे, इथली व्यवस्था सोडून मी स्वतः कोठेही जाऊ शकत नाही.'

'ठीक आहे! दुसऱ्या कोणाला पाठवून त्यांना परत बोलवा.' असे सांगून त्यांना जायला सांगितले.

**विनयादित्यांची नाराजी**

इतक्यात युद्धक्षेत्रातून गुप्तहेर आल्याची

बातमी मिळाली आणि देवींनी राजकुमार विनयादित्याना बोलावणे पाठविले.

युद्धभूमीवरील परिस्थिती, पावसाळ्याच्या चार महिन्यांकरिता रसद वगैरे गोष्टींवर विस्तृत चर्चा झाली. स्वतः महादेवींनी सन्निधानांकरिता पत्र लिहून दूताजवळ दिले. दूत निघून गेल्यानंतर बराच वेळ राजकुमारांना युद्धाचे परिणाम, आर्थिक स्थिती, करवसुली आदि अनेक बाबींवर मार्गदर्शन केले आणि म्हटले, ' बघा. कुमार, तुम्हालाही आता या सर्वात लवकरच लक्ष घालावे लागेल! तुम्ही चार बंधूंनी एकमेकांची साथ न सोडता एकमेकांना पूरक कसे राहता येईल याकडे लक्ष द्यायला हवे. तुम्हाला अभ्यास असेल ना? तुम्ही आता जा, आम्ही थोडावेळ विश्रांती घेतो.' असे सांगून त्यांनी राजकुमारांना निरोप दिला.

कितीही दृढ आत्मविश्वास असू देत, 'स्वतःच्या हत्येची' बातमी ऐकल्यावर मन उद्विग्न होतेच.... त्यांच्या मनात विचार सुरु झालेत– हे जग किती विचित्र आहे. माझ्याकडून असे काय घडले की लोकांना मला मारण्याची इच्छा व्हावी ? आणि त्या लहानपणापासूनचा स्वतःचा जीवनपट आठवू लागल्या. विचार करता करता त्यांचा डोळा लागला. राजकुमार विनयादित्य सायंकाळच्या जेवणाकरिता आवाज देऊ लागले, तेव्हाच त्या जाग्या झाल्या.

दोघांचेही जेवण मौनपूर्वक सुरु होते. दोघांच्याही मनात काहीतरी सलत असल्याचे त्यांना जाणवत होते. परंतु शब्द अडकले होते....संवादाला दिशा मिळत नव्हती....कुठूनतरी सुरुवात करायची म्हणून पट्टमहादेवींनी विचारले,

' आज गुरुजी तुमच्यावर नाराज होते कां अप्पाजी?'

' ते कां नाराज होतील ?'

' तुम्ही असे शांत शांत बसला आहात ना.....!'

' आई जर शांत, आपल्याच विचारात असेल तर आम्ही काय करावे?'

' मी युद्धाच्या विचारात होते, तुम्ही काय शिकलात आज ?'

' मनुष्याहून विश्वासघातकी प्राणी कोण असतो ? हा पाठ....!'

' म्हणजे पंचतंत्र....'

' अर्थात् ...! शिवभूती, वाघ, माकड आणि साप यांचे उदाहरण देऊन शिकविलेला पाठ !'

' अशांनाच ' मानवपशू' म्हटले जाते !'

' हे माहित असतांना आपण त्या धर्मदर्शी आणि त्यांच्या अनुयायांना मोकळे सोडले? हा कुठला न्याय? ते झुंडशाही करून भेदनीतीचा वापर करून आमचे सिंहासन हिसकावू बघताहेत....हे ठीक आहे का?'

' अप्पाजी, शांत व्हा! ही दुरालोचना झाली!'

' भोगावे तर आम्हाला लागते ना!'

' आम्ही म्हणजे ? तुमच्यात कुमार नरसिंह देखील आहेत ना ! ते छोटे आहेत...त्यांच्याबद्दल मनात कटू भावना ठेवणे ठीक आहे कां? तुम्हा सर्वांचे पिता एकच आहेत ना !'

' परंतु ते त्यांच्या आईवर गेलेत ना ! राजमहालाच्या या वातावरणात वाढले नसल्याने त्यांचे रंगच वेगळे दिसतात !'

' असे बोलू नये! भावना काहीही असू देत, क्रमबद्धता बदलत नाही!'

' होऊ शकते ! पण असे समजून हातावर हात ठेवून निष्क्रिय बसणे योग्य ठरेल? आम्ही पुरुषार्थ केलाच नाही तर निमित्त काय करणार ? मानवीयता जपणारे आपले घराणे... राज्यात मानवीयता टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणार नाही का? असेल नशीबाच्या गोष्टी कधी आपल्या पूर्वजांनी केल्या की पिताश्री करताहेत?'

' तुम्ही अजून नासमज आहात.. या गोष्टीत नका पडू! इकडे लक्ष घालाल तर आपली कार्यशक्ती घालवून बसाल !'

यानंतर पुन्हा दोघेही मौनाने जेवण करू लागले.

**सल्लेखनेचे विचार**

जेवणानंतर आज कुणाशीही भेटण्याचे टाळून त्या काही काळ देवघरात शांततेत बसल्या. बराच वेळ चिंतन करून आपल्या महालात आल्या.

बसल्या बसल्या परत त्याच षड्यंत्राच्या विचाराने घेरले....' माझी हत्या झालीच तर...तर माझी तीन मुले गप्प बसतील ? धाकट्या विनयादित्यांचा सूर तर आजच समजला! यावरून त्यांचे बंधू काय करतील याचा अंदाज लावता येतो....आणि जर सन्निधानांनी स्वतःच मोठ्या अप्पाजींना सांगितले तर या प्रकरणाचा काय शेवट होईल? चांगला किंवा वाईट प्रत्येकाला मृत्यू तर येणारच आहे ना.... मग त्यात इतका विचार करण्यासारखे काय ? कां हा हत्येचा विषय वारंवार वारंवार मनात घोळतो ! याप्रमाणे आतंकित राहण्यापेक्षा स्वतःच समाधिमरणाकडे पावले टाकलेली काय वाईट ? अशा प्रकारे आर्त-रौद्र परिणामांनी आकुलित होण्यापेक्षा शांतपणे, निर्भीडपणे मृत्यूला सामोरे जाणे कधीही योग्यच.....! शास्त्रात समाधी घेण्याचा, सल्लेखनेने शरीर आणि कषाय क्षीण करण्याचा योग्य मार्ग सांगितला आहेच ना....! त्यापूर्वी इथले गैरसमज दूर करावेत...सन्निधानांना परत येऊ द्यावे.... तोपर्यंत कोणालाही न सांगता आपण आपली शारीरिक आणि मानसिक तयारी सुरु ठेवावी.... प्रत्येक गोष्टीतली आपली निर्णय शक्ती कमी करावी.... स्वतःला राजकार्यापासून दूर करून मुलांकडे किंवा योग्य व्यक्तींकडे जबाबदारी सोपवावी...'

आणि त्यांनी दासीला आवाज दिला,'माझी वीणा घेऊन ये !'

पलंगावर बसून वीणावादन सुरु केले..सूर लागत गेले...रात्र चढत गेली....चढत गेली.... वीणावादन तन्मयतेने सुरु होते... रात्र झाली.... राजमहालातील दासी- दास वर्ग महालाच्या दाराशी गर्दी करून तल्लीनतेने ऐकू लागला, ऐकता ऐकता पेंगू लागला....पण वीणावादन थांबण्याचे नाव घेईना ! पट्टमहादेवींनी तक्क्याला डावा हात टेकवून वीणा ठेवली होती आणि उजवा हात तारांवर फिरत होता....दिव्याचा प्रखर प्रकाश त्यांच्या चेहऱ्यावर पडून राहिला होता... जणू गानसमाधी लागली होती! त्याच अवस्थेत त्या गाढ झोपी गेल्या!! दासीने बघितले, उठवून वीणा उचलली असती तर...तर झोपमोड होण्याची शक्यता... आता काय करावे ? तिने हळुवारपणे हात बाजूला करून वीणा उचलली, भिंतीला टेकवून ठेवली, पांघरूण घातले, दिव्याच्या वाती मंद केल्या आणि आपल्या जागी जाऊन बसली .

दुसऱ्या दिवशी महादेवी जरा उशीरानेच जाग्या झाल्या आणि कालचे सगळे आठवले! प्रसन्नतेने हसून आपल्या नित्यकर्माला लागल्या.

### भयग्रस्त छोट्या राणी व चिडलेले विनयादित्य

इकडे तुळुकाडूमधे धर्मदर्शी, राणी लक्ष्मीदेवी आणि राजकुमार नरसिंह यांची पाचावर धारण बसली होती. कारणही तसेच होते. राजकुमार नरसिंह आणि राणी लक्ष्मीदेवी यांच्या हत्येच्या षड्यंत्राचा नुकताच सुगावा लागला होता! राणींना चांगलाच धक्का बसला होता!! नेहमीप्रमाणे यासाठी पट्टमहादेवीच कारणीभूत असणार, असा त्यांनी कसलीच शहानिशा न करता समज करून घेतला.

तुळुकाडूमधून गुप्तहेर राजधानीत दाखल झाले. सर्व महत्त्वाचे अधिकारी, पट्टमहादेवी, राजकुमार विनयादित्य सर्वांसमोर हेरांनी परिस्थिती विशद करीत, त्यांच्या कामासंबंधी घडलेल्या गोष्टी, भेटलेले लोक, षड्यंत्रांच्या बातम्या पसरविणारे जातीय विद्वेषी लोक याची माहिती दिली. भयग्रस्त, गैरसमजांनी परिपूर्ण राणी लक्ष्मीदेवींची मनःस्थिती सांगितली .

दोन्ही ठिकाणी हत्येची बातमी पसरविणारे लोक पकडण्यात आले होते. राणी लक्ष्मीदेवी आपले पिता आणि पुत्र यांच्यासहित दोन-तीन दिवसांत राजधानीत पोहचणार होत्या. लवकरच बैठक बसणार होती. बातमी देऊन हेर निघून गेले .

औपचारिक चर्चा संपताच मुत्सद्दी तेवढे उरले. पट्टमहादेवींची हत्या कां करावी वाटत असावी? यावर चर्चा सुरु असतांना राजपुत्र विनयादित्य म्हणाले,

‘ मातुश्री, सर्वांवर आपला प्रभाव आहे, आपल्या प्रेम आणि आदरपूर्वक व्यवहाराने सगळेच आपणास गौरवपूर्ण दृष्टीने बघतात. पिताश्री देखील आपले म्हणणे ऐकत असतात.आपणच जर राहिला नाहीत तर आपआपल्या मर्जीनुसार लोकांना वळविणे सोपे जाईल... विद्वेषाचे बीज रोपणात आपण अडसर आहात.. आपण नसलात तर त्यांना त्यांचा स्वार्थ साधण्यात काही बाधाच राहणार नाही!’

‘ तुमच्या बोलण्याचा आशय असा आहे ना की, एकमेकांबद्दल प्रेम आणि आदरभावना तोपर्यंतच आहे; जोपर्यंत मी जिवंत आहे......!’

‘ हो....! मनुष्य अत्यंत तुच्छ वृत्तीचा आहे... धनाच्या लालसेने काहीही करण्यास तयार होतो.. अशा नीच व्यक्तीपासून राजासुद्धा स्वतःला वाचवू शकण्यास असमर्थ ठरतो!’

‘ लालसेच्या वशीभूत माणूस काहीही करू शकतो हे मान्य... परंतु लालसेपासून दूर राहण्याची प्रेरणा तर आपण देऊच शकतो ना !’

‘हे तर हवेत तलवार चालवून स्वतःचे हात दुखवून घेणे झाले ! पणजोबांच्या काळात आणि आताच्या काळात खूप बदल झाला आहे! मात्र आपले ध्येय एकच आहे.. ते म्हणजे सुखी राज्य !’

‘ तुमच्या पद्धतीने राज्य करण्यास तुम्हाला वाट बघावी लागेल अथवा आपल्या हिश्श्याला येईल तेवढे घेऊन समाधान मानावे लागेल...!’

‘ आमचे हक्काचे कोणी हिरावत असेल आणि आम्ही प्रतिकार करायचा नाही...असे कसे होऊ शकेल?’

‘ हेच तर संघर्षाचे मूळ आहे..!’

‘ टक्कर झाली तर क्रिया घडेलच! क्रियाच नसेल तर मनुष्य वठलेल्या झाडासारखा होईल ना !!’

विनयादित्य आपल्या विचारापासून तसूभरही हलायला तयार नव्हते, तर पट्टमहादेवी सगळ्यांमधे एकी रहावी यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होत्या.

‘ खोट्या अफवा पसरविणाऱ्यांना आम्ही घाबरत राहिलो तर, आम्हाला राजमहालातूनही हुसकावले जाईल.....!’

‘असे बोलू नये, अप्पाजी!’

‘मला सांगा, आपल्या राज्याचा नियम आहे की, युद्धक्षेत्रात ज्या बातम्या पोहोचविल्या जातील, त्या फक्त आणि फक्त राजमहालाकडून जातील, होय ना? मग छोट्या राणी आणि राजकुमार नरसिंहाच्या हत्येच्या षड्यंत्राची बातमी पिताश्रींपर्यंत पोहोचली कशी ? तिथे त्यांना काळजीत पाडण्याचे काम कसे झाले ? कां त्या तिघांनाही राजधानीत बोलवण्याचा संदेश आला ?’

‘ विषय पूर्ण समजून घेतल्याशिवाय अशा कल्पना करू नयेत. तुम्हाला काय वाटते, तुमचे पिताश्री चिंतेत पडले? तर मग त्यांनी राणींना सरळ आपल्याजवळच बोलविले असते ना.... इथे बोलवा हे सांगण्याची काय गरज होती? अथवा सुरक्षा वाढविली असती...!’

‘ पिताश्रींनी दिलेली सूचना जास्त सुरक्षेची आहे. एक वाक्प्रचार आहे – मधनाच्या सुरक्षेसाठी ते चोराच्याच हाती सोपवले, तर धोका राहत नाही’! पिताजींनी छोट्या राजकुमारांकरिता काहीही जरी केले, तरी आरोप तुमच्यावरच येणार हे निश्चित ! जाऊ द्या. पण मला मात्र आता इथे राहावेसे वाटत नाही. आपण परवानगी दिली तर मी दादांजवळ जाऊ ?’

‘ म्हणजे मला एकटीला सोडून जायला तुम्ही तयार आहात....!’

‘ मातुश्री..! तुम्ही तर सगळ्यांना घेऊनच चालणार...! मला जे आवडत नाहीत, त्यांच्यासोबत मी नाही राहू शकत !’

‘ त्यांनी तुमचे काय बिघडवले ? उद्या तुम्हाला राज्यकारभार सांभाळण्यास मोठ्या अप्पाजींना साथ द्यायची आहे. आपली प्रत्येक कृती आदर्श असायला हवी. जनता आपल्याकडून अनुकरणीय व्यवहाराची अपेक्षा ठेवते. साधारण लोकांप्रमाणे वागाल तर तो मूर्खपणा होईल! राजपरिवारात जन्माला येणं, म्हणजे काटेरी मुकुट धारण करणे असते!! बरेच कैदी आणले आहेत. न्यायसभेत उपस्थित राहून सहजपणे वागायचे आहे... समजलात ना ?’

विनयादित्यांना मौन राहिलेले बघून त्या परत म्हणाल्या, 'परत एकदा सांगते; धर्मदर्शी, राणी आणि राजकुमार यांच्याशी व्यवस्थित वागायचे-बोलायचे !'

' त्यांनी कळ काढली तरी......'

' त्याकडे दुर्लक्ष करायचे !'

' प्रयत्न करेन!'

स्वतःच्या हत्येच्या षड्यंत्राच्या बातमीला तर महादेवींनी सहजतेने घेतले होते, मात्र सतत पट्टमहादेवींना पाण्यात पाहणाऱ्या छोट्या राणींच्या संरक्षणासाठी त्या ढाल बनून उभ्या ठाकल्या.

सगळ्यांतून निवृत्त होऊन बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करीत असतांना, जबाबदाऱ्या अंगावर येऊन पडतातच! कितीही नकोसे वाटले तरी स्वीकार करून आदर्शत्वाचा पाठ सर्वांपुढे ठेवावाच लागतो...अशा पट्टमहादेवी सर्वांमध्ये राहून स्वतःला वेगळं कसं करतात...ते बघू या पुढील भागात..!

**( क्रमशः )**

## बाहुबली मध्ये संयम दिवस वैराग्य व भक्तीमय वातावरणात संपन्न

प. पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात प. पू. १०५ अनुश्रुतमती माताजी यांचा ९वा संयम दिवस दि. १० मे रोजी वैराग्य व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी आचार्यश्रींच्या संघातील सर्व त्यागींनी माताजींचा त्याग, स्वभाव व त्यांच्या संयम दिनाविषयी आपले विचार मांडले. संयम दिवस म्हणजे आत्मसंयम, शिस्त, सहनशीलता आणि चांगल्या आचरणाचे महत्त्व समजावून सांगणारा दिवस होय. हा दिवस सर्व साधर्मीजणांना आपला आचार, विचार व सदाचाराच्या शुद्धतेविषयी प्रेरणा देणारा आहे, असे परमपूज्य १०८ आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी यांनी सांगितले.

परमपूज्य १०८ आचार्य सुयशसागरजी महाराज यांनी आपल्या मंगल आशीर्वाचनामध्ये माताजींच्या स्वभावाविषयी सांगत असताना ते म्हणाले,- सहजता, सरलता, ऋजुता आणि उदारता या गुणांनी युक्त असणाऱ्या या माताजींनी हे सर्व गुण संयमामुळेच साध्य केले आहे. संयमः खलु जीवनम् अर्थात संयमच जीवन आहे आणि योग्य व अबाधित, अखंडित सुख देणारे आहे. संयमाची इच्छा तर सर्वच करतात पण फारच दुर्लभ लोकांना संयम भाव प्राप्त होतो. या संयम दिवसाचे अवचित साधून सोलापूर, नातेपुते, फलटण, पंढरपूर, बाहुबली इत्यादी परिसरातील साधर्मी आलेले होते. त्यावेळी सर्वप्रथम आचार्यश्रींचे पादपूजन, शास्त्रभेट, पूजन व विविध श्रावकांची मनोगते झाले. त्यावेळी परमपूज्य १०५ अनुश्रुतमती माताजी यांच्यासोबतच समाधीस्थ परमपूज्य १०५ अनुप्रेक्षामती माताजी व परमपूज्य १०५ अनुभूतमती माताजी यांचा सुद्धा ९वा संयम दिवस असल्याने त्यांच्याविषयी सुद्धा सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. संपूर्ण हा संयम दिवसाचा पावन कार्यक्रम वैराग्य भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

*****

## कंकुबाई कन्या शाळेच्या कलाशिक्षिका दिपाली मेहेत्रे यांची बालभारती तर्फे निवड

कंकुबाई कन्या शाळेच्या कलाशिक्षिका सौ. दिपाली मेहेत्रे मॅडम यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांच्या वतीने इयत्ता सहावीच्या कलाशिक्षण पाठ्यपुस्तकासाठी समीक्षक म्हणून निवड झाली आहे. ही बाब संस्थेसाठी अतिशय गौरवास्पद आहे. या गेल्या २५ वर्षांपासून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. मराठी साहित्य, गझल लेखन व ललित लेखनाची त्यांना विशेष आवड असून त्यांच्या लेखनातून संवेदनशीलता आणि कलात्मकता प्रकर्षाने दिसून येते. शाळेमध्ये त्यांनी साकारलेले आकर्षक, विचारप्रवर्तक फलकलेखन सतत विद्यार्थी, पालक व अधिकारी यांचे लक्ष वेधून घेतात. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे संस्थेचे सचिव व शाळा समितीचे अध्यक्ष श्री. संजीव रूईवाले, मार्गदर्शिका प्रज्ञाताई डोणगावकर, रत्नप्रभा मेहता बालविकास मंदिरच्या संचालिका उल्काताई रूईवाले, मुख्याध्यापिका कल्पना घोंगटे, पर्यवेक्षिका मेघा उफाडे आणि संपूर्ण कंकुबाई परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा!!

# ब्रिटीशकालीन जनगणना आणि जैन समाज : तणाव व संघर्षाचा इतिहास (इ.स.१८७२-१९५१)

**- रुपेश मडकर,** विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छ. संभाजीनगर, संपर्क - ८०८७९२६६५२

सध्या भारतात **सोळाव्या जनगणनेची** प्रक्रिया सुरू झाली आहे. ही जनगणना २०२७ मध्ये पूर्ण होईल. या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक, सामाजिक, भाषिक तसेच जातीय गट आपापले हितसंबंध पुढे नेण्यासाठी किंवा कायम ठेवण्यासाठी संबंधित धार्मिक, सामाजिक, भाषिक व जातीय गटांना जनगणनेत कोणत्या रकान्यात काय माहिती द्यायची याबाबत माहिती देणारी पत्रके विविध समाजमाध्यमांवर दिसत आहेत. जनसंख्येत आधीच अल्पसंख्य असलेल्या जैन धर्मातील सामाजिक कार्यकर्ते सुद्धा याला अपवाद नाहीत. अर्थात, जैन धर्मात एकच एक अस्मिता (identity) नाही. जैन धर्मीय लोक पंथ, प्रदेश, भाषा, जात आदी विभाजकांनी विभागलेले आहेत. जनगणनेची सुरूवात ब्रिटिशांनी केली तीच मुळी भारतीय समाजाची अधिकृत माहिती मिळावी, जेणेकरून या पूर्णतः अनभिज्ञ प्रदेशात राज्य चालवणे सुकर होईल या विचाराने. भारतात प्रचंड सामाजिक, धार्मिक, भाषिक व प्रादेशिक वैविध्य आहे. ब्रिटिशांना याची जाणीव आधीच झाली होती. तशा नोंदी विविध अधिकारी घेत होते. परंतु ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने जेव्हा व्यापारासोबत राज्यकारभार सुरू केला व एकेक भारतीय प्रदेश ताब्यात घ्यायला सुरूवात केली तेव्हा त्यांना येथील सामाजिक परिस्थिती समजून घेण्याची निकड वाटू लागली. त्यातून लोकांची संख्या मोजणे, त्यांचे विविध गटात वर्गीकरण करणे अशा एका साधनाची सुरूवात झाली,ज्यास जनगणना म्हणले जाते.

आधुनिक भारतातील जैन अस्मितेची (identity) जडणघडण वासाहतिक प्रशासनाच्या वाटचालीशी; विशेषतः ब्रिटीश प्रशासनाने इ. स. १८७२-१९४१ दरम्यान राबवलेल्या दशवार्षिक जनगणनेच्या प्रक्रियेशी अविभाज्यपणे निगडीत आहे. ऐतिहासिकदृष्ट्या एक प्रवाही धार्मिक समुदाय म्हणून जैनधर्माचे अस्तित्व कायम होते. वासाहतिक काळात जनगणना सारख्या 'राजवटीच्या तंत्राने' जैन धर्मासारख्या प्रवाही आणि प्रादेशिक वैविध्य असलेल्या धार्मिक समुदायासमोर मोठेच आव्हान उभे केले. लोकसंख्येचे मोजमाप करून तिला विविध कप्प्यात विभागावे लागणार होते, त्यासाठी वय, लिंग, प्रदेश याच बरोबर धर्म, जात यासारख्या कोटिक्रमांची योजना करण्यात आली. हे कोटिक्रम निश्चित करणे अवघड होते. जनगणनेसाठी हे कोटिक्रम (categories) काटेकोर असणे आवश्यक होते. जैन धर्मासारख्या प्रवाही परंतु अल्प लोकसंख्येच्या समुदायाला हे काटेकोर कोटिक्रम लावून विभागणे अन्यायकारक होते, त्यामुळे ते संघर्षाचे कारण बनले. सुरूवातीला तर जैन धर्म हा हिंदूंचा एक भाग आहे, अथवा बौध्द धर्माची एक शाखा आहे असे मानण्याचा ब्रिटीश सत्तेचा कल होता. त्यातून ब्रिटीशकालीन भारतात प्रतिनिधित्वाचा संघर्ष, जनगणनेतील राजकारण, जैन धर्माबाबतचा पूर्वग्रह, आणि या तणाव व संघर्षातून घडत गेलेली जैन आत्मप्रतिमा यांचा वेध या लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**जनगणनेची सुरुवात : १८७१-१८८१ आणि वर्गीकरणाचे संकट**

ब्रिटीश भारतातील पहिली जनगणना ही इ. स. १८७१-१८७२ दरम्यान झाली. ही जनगणना एक सलग संपूर्ण ब्रिटीश भारतात न घेता प्रादेशिक

स्तरावर घेण्यात आली होती. त्यामुळे त्यात अनेक विसंगती होत्या. या काळातील ब्रिटीश प्रशासनावर प्राच्यविद्येतून निर्माण होणाऱ्या संकल्पनांचा, ब्रिटिशांना माहिती पुरवणाऱ्या उच्चवर्णीय ब्राह्मणवादी माहितगार यांचा प्रभाव होता. धर्म, वर्ण, जात आणि ज्याला इंग्रजीत caste म्हणले गेले अशा कोटिक्रमांची सरसकट सरमिसळ केली गेली. नवीन कोटिक्रम घडवले गेले. उदाहरणार्थ 'धर्म' या कोटिक्रमाचा पारंपारिक अर्थ व संदर्भ पूर्णपणे भिन्न होता, परंतु पाश्चिमात्य व विशेषतः ख्रिश्चन धर्माच्या व्याख्येत एतद्देशीय धर्म/श्रद्धा परंपरांना व्याख्यांकित करण्यात आले. Caste नावाचा नवा कोटिक्रम पारंपारिक जात-वर्ण यांच्या सरमिसळीतून घडवला गेला. प्रादेशिक, स्थानिक पातळीवर असणाऱ्या श्रद्धा परंपरांना, स्थानिक संदर्भांना बेदखल करून उत्तर-दक्षिण-पूर्व पश्चिम अशा देशपातळीवरील कोटिक्रमात बसवले गेले. जनगणनेतील कोटिक्रम निश्चित केले गेले. जे. एच. हटन यांनी हे कोटिक्रम अडचणीचे, पुरेशी स्पष्टता नसलेले असल्याचे कबुल केले होते, परंतु हेच कोटिक्रम उपलब्ध असल्याची हतबलता त्यांनी आपल्या सन १९३१ च्या जनगणना अहवालात स्पष्ट नमूद केली आहे. त्यातून सुरूवातीला जैन धर्मियांना भारताच्या सामाजिक परिवेशात कोणते स्थान द्यायचे याबद्दल निश्चित निर्णय झाला नाही. त्यामुळे सन १८७१-७२ च्या जनगणनेत 'जैन' असा स्वतंत्र कोटिक्रम न देता जैन धर्मियांना बौद्ध धर्मीयांसोबत दर्शवले गेले. यामुळे या जनगणनेत जैन धर्मियांचे प्रतिनिधित्व नाकारले गेले, असा आरोप नंतर जैन समाजाच्या नेतृत्त्वाने केलेला दिसतो. हेन्री वॉटरफिल्ड यांनी लिहिलेल्या 'मेमोरँडम ऑन द ब्रिटीश इंडिया सेन्सस १८७१-७२' मधून हा महत्त्वपूर्ण पद्धतशीर पूर्वग्रह दिसून येतो. यामध्ये हे दिसून येते की, जैनांना अनेकदा बौद्धांसोबत एकत्रित केले जात असे किंवा ख्रिश्चन, ज्यू, पारशी आणि विविध 'डोंगराळ जमातीं'चा समावेश असलेल्या 'इतर' (Others) या सरसकट श्रेणीत टाकले जात असे. आपल्याला हेही लक्षात येते की पुढे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत सुद्धा जैन समुदायाला हिंदू, बौद्ध व शीख समुदायासोबत एकत्रित स्थान दिले आहे. अर्थात, जैन धर्माचे स्वतंत्र अस्तित्व राज्यघटनेत मान्य केलेले आहे.

मुंबई इलाख्यात, १८७१-७२च्या आकडेवारीनुसार 'बौद्ध आणि जैन' यांची एकत्रित संख्या अंदाजे १,९१,१३७ इतकी होती, ती प्रामुख्याने बेळगाव आणि अहमदाबाद जिल्ह्यांत केंद्रित होती. मात्र, या दोन धर्मांमधील फरक स्पष्ट करण्यात आलेल्या अपयशामुळे जैनांच्या विशिष्ट लोकसंख्येचे वास्तव अस्पष्ट राहिले. जैन धर्माला एक स्वतंत्र अस्तित्व म्हणून ओळखण्यात वासाहतिक सुरुवातीची असमर्थता ही **श्रमण परंपरेबाबतच्या** गैरसमजातून निर्माण झाली होती. सुरुवातीच्या ब्रिटीश प्रशासकांनी जैन धर्माला एक तर बौद्ध धर्माचा भाग मानले; अथवा हिंदू धर्माची एखादी सुधारित शाखा मानले.

| प्रदेश | एकूण लोकसंख्या | बौद्ध व जैन | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ब्रिटीश भारत (एकूण) | १९,०५,६३,०४८ | २८,३२,८५१ | १.४८% |
| ब्रिटीश भारत (बर्मा वगळून) | १८,७८,१५,२१७ | ३,८५,०२० | ०.२०% |
| मुंबई इलाखा | १६,३४९,२०६ | १,९१,१३७ | १.१६% |
| ब्रिटीश बर्मा | २७,४७,१४८ | २४,४७,८३१ | ८९.१०% |

तक्ता १: १८७१-७२ च्या जनगणनेतील धार्मिक गट (निवडक) स्रोत: वॉटरफिल्ड, १८७५

पुढे सन १८८१ मध्ये जी पद्धतशीर आणि एकत्रित जनगणना झाली (दशवार्षिक जनगणनेची सुरुवात) त्यात 'जैन' हा कोटिक्रम स्वतंत्रपणे स्वीकारला गेला. **हर्मन जेकोबी या जर्मन अभ्यासकाने जैन धर्म हा स्वतंत्र धर्म असून तो हिंदू अथवा बौद्ध धर्माचा भाग नाही असा स्पष्ट निर्वाळा १८७९ साली** कल्पसूत्राला जी प्रस्तावना लिहिली त्यातून दिला. त्यामुळे ब्रिटीश प्रशासनाने जैन धर्म हा स्वतंत्र असल्याचे स्वीकारले व पुढील जनगणनेत तशा सुधारणा झाल्या. यात एकूण जैन लोकसंख्या १२,२१,८९६ (०.४८%) नोंदवण्यात आली.

अर्थात, त्यातही अनेक चुका व स्थानिक पातळीवरील गणनकांचे ज्ञान, पूर्वग्रह, जैन लोकांचा 'स्व' जाणीवेचा अभाव अशी अनेक कारणे अंतर्भूत होती.

**धार्मिक श्रद्धेचे वर्गीकरण : स्वतंत्र धर्म विरुद्ध हिंदू पंथ**

वासाहतिक काळातील जैन समुदाय आणि ब्रिटीश प्रशासन यातील वादाचा मुद्दा, ब्रिटिशांनी जैन समुदायाची व्याख्या 'हिंदू चौकटीत' करण्याबाबत होता. ही ब्रिटीश जनगणनेतील नोकरशाहीचा 'ब्राह्मणवादी दृष्टिकोन' आणि जैन समुदायाचा 'स्वायत्त श्रमण वारसा' असल्याचा दावा यांमधील लढाई होती.

**ब्राह्मणवादी दृष्टिकोन आणि वसाहतकालीन पूर्वग्रह**

ब्रिटीश नोकरशाही (विशेषतः एच. एच. रिस्लेसारख्या व्यक्ती) 'वर्ण' या पारंपरिक उतरंडीच्या श्रेणीवर विश्वास ठेवणाऱ्या ब्राह्मण विद्वानांच्या सल्लयावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून होती. या दृष्टिकोनातून अनेकदा जैनांच्या सामाजिक वास्तवाचे विकृतीकरण केले गेले. अनेक जैन हे व्यापारी (बनिया) जातीचे होते आणि त्यांच्या सामाजिक चालीरीती (उदा. आहार आणि आंतरजातीय विवाह पद्धती) हिंदू वैष्णवांसारख्या होत्या. त्यातून अनेक जनगणना अहवालांमध्ये जैनांचे वर्णन हिंदू धर्माचा एक 'सुधारित पंथ' (जसे की ब्राह्मो समाज किंवा आर्य समाज) असे करण्यात आले.

या प्रकारच्या वर्गीकरणाचे गंभीर कायदेशीर आणि राजकीय परिणाम होते. जर जैन हा हिंदू धर्माचा एक पंथ म्हणून गणला गेला असता, तर त्याला **हिंदू वैयक्तिक कायद्याच्या** (Hindu Personal Law) कक्षेत आणले गेले असते आणि राजकीय प्रतिनिधित्वासाठी त्यांची संख्या हिंदू बहुसंख्येत विलीन झाली असती. याउलट, स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळाल्यास त्यांना स्वतःच्या कायदेशीर चौकटीसह अल्पसंख्याक समुदायाचा दर्जा मिळाला असता. अर्थात, तत्कालीन संख्येच्या राजकारणावर याचा मोठा परिणाम झाला असता. सन १९०९ मध्ये मुस्लीम समुदायाने स्वतंत्र मतदारसंघ धार्मिक अल्पसंख्याक असल्याच्या आधारावर मागितले आणि 'फोडा व राज्य करा' या नीतीला अनुसरून ब्रिटिशांनी मुस्लीम स्वतंत्र मतदारसंघ असण्याला १९०९ च्या मोर्ले – मिंटो कायद्याने परवानगी दिली. त्यामुळे प्रतिनिधीत्वाचे राजकारण वेग घेऊ लागले. याविरोधात हिंदू महासभेने आघाडी उघडली. त्यातून संख्येच्या राजकारणाने उचल खाल्ली. परिणामी हिंदू महासभेने आर्थिकदृष्ट्या प्रभावी असलेल्या आणि संख्येच्या राजकारणातून जैन धर्म हा स्वतंत्र नसून हिंदू धर्माचाच भाग असल्याची भूमिका घेतली.

**श्रमण प्रति–कथन (Counter-Narrative)**

जैन विद्वान आणि नेत्यांनी या ब्राह्मणवादी पूर्वग्रहाचा विरोध करताना असा युक्तिवाद केला की, जैन धर्म हा एक एतद्देशीय, अ–वैदिक धर्म आहे. त्याची मुळे प्रागैतिहासिक काळात आहेत. अनेकांतवाद आणि वेदांचे प्रामाण्य व ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारणे, ईश्वराचे निर्माता असण्याला विरोध या सारख्या जैन तत्त्वज्ञानाच्या वेगळेपणावर त्यांनी भर दिला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील सिंधू संस्कृती आणि मथुरेतील पुरातत्वीय शोध ही साधने जैन धर्माचे मूळ वेदांच्या आगमनापूर्वीचे असल्याचे सिद्ध करण्यासाठी वापरली गेली.

या वैचारिक दाव्यांनंतर कायदेशीर मान्यताही मिळाली. मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयांमध्ये, न्यायमूर्ती रांगणेकर आणि न्यायमूर्ती कुमारस्वामी शास्त्री यांसारख्या न्यायाधीशांनी अखेर असा निकाल दिला की, जैन हे मूळचे हिंदू नसून त्यांच्या स्वतःच्या धार्मिक विधी आणि कायदेशीर व्यवस्था असलेल्या वेगळ्या धर्माचे अनुयायी आहेत. अर्थात, हे निकाल यायला १९२६ साल उजाडले. परंतु वासाहतिक शासनाने ही बाब स्वीकारली नाही. एकट्या दुकट्या कायद्यापुरते जैन धर्माच्या स्वतंत्र कायद्याला अस्तित्व राहिले.

प्रतिनिधित्वाच्या राजकारणातही जैन धर्मियांना 'हिंदू चौकटीतच' पाहिले गेले. वस्तुतः भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेने सप्टेंबर १९०९

मध्येच जैन हा 'महत्त्वाचा अल्पसंख्याक' समुदाय असून त्याला पर्याप्त प्रतिनिधित्त्व दिले जाण्याची मागणी ब्रिटीश सत्तेकडे केली होती. या मागणीला अनुकूल असल्याचे तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांनी महासभेस कळवले देखील होते, परंतु हे आश्वासन कधीही पूर्णत्वास गेले नाही.

हिंदू महासभेच्या 'जैन हे हिंदूच' आहेत अशा मांडणीला तत्कालीन जैन नेतृत्वाने वेळोवेळी उत्तर देऊन आपले धार्मिक अस्तित्व स्वतंत्र असल्याचे नमूद केले होते. कीर्तनसम्राट तात्यासाहेब चोपडे यांनी लिहिलेले 'जैन आणि हिंदू' हे पुस्तक याचे उदाहरण म्हणून पाहता येते. जैन गॅझेट, जैन मित्र तसेच अन्य तत्कालीन पत्रकांनी जैन धर्माच्या इतिहासाची मांडणी करण्याला प्राधान्य दिले. जैन इतिहासावरील पुस्तके लिहिली गेली. व्याख्याने आयोजित केली गेली. एका अर्थाने जैन धर्माचे अस्तित्व पणाला लागल्याने जैनांचे 'जैनत्व' कशात आहे हे सांगण्याची अहमहमिका लागल्याचे या काळातील प्रसिद्ध साहित्यावर नजर टाकल्यास दिसून येते.

**लोकसंख्याशास्त्रीय भीती : स्थिरता आणि विधवांचा प्रश्न (१८९१–१९३१)**

सन १८९१ ते १९२१ दरम्यान, जनगणनेच्या आकडेवारीनुसार जैनांची संख्या सातत्याने घटत असल्याचे दिसून आल्याने जैन समुदायात 'लोकसंख्याशास्त्रीय भीती' (Demograhic Panic) पसरली. हा कल जैन समुदायाच्या अस्तित्वासाठी धोकादायक मानला गेला. या संख्याशास्त्रीय घटीचे कारण बाह्य असले तरी तत्कालीन जैन समाजसुधारकांनी अंतर्गत कारणांनाही या लोकसंख्येच्या घटीसाठी जबाबदार धरले. विविध साथीचे रोग पसरून लोक मृत्युमुखी पडत. – याचे उदाहरण म्हणून सन १८९७–९९ दरम्यान मुंबई इलाख्यात पसरलेला प्लेग हा साथीचा रोग, यामुळे शहरात वास्तव्यास असलेल्या जैन व्यापारी कुटुंबांची मोठी वाताहत झाली, अनेकांचा मृत्यू झाला तर अनेकांनी स्थलांतर केले. त्याचबरोबर १९१९–२० या वर्षात आलेला इन्फ़्लुएन्ज़ा हा साथीचा मोठा रोग असाच शहरी लोकसंख्येवर परिणाम करणारा ठरला. सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव, प्रगत वैद्यकीय सुविधांचा अभाव, वाहतुकीच्या साधनांची कमतरता आदि अनेक कारणांनी तत्कालीन समाजात मृत्यू दर उच्च होता तसेच सरासरी आयुष्यमान कमी होते. या कारणांची चर्चा तत्कालीन जैन पत्रकात मोठ्या प्रमाणावर दिसते.

| जनगणना वर्ष | एकूण जैन (हजारात) | एकूण टक्केवारी | दशकातील बदल (%) |
|---|---|---|---|
| १८८१ | १,२२२ | ०.४९% | – |
| १८९१ | १,४१७ | ०.५१% | +१५.९४% |
| १९०१ | १,३३४ | ०.४७% | –५.८३% |
| १९११ | १,२४८ | ०.४१% | –६.४७% |
| १९२१ | १,१७७ | ०.३९% | –५.२६% |
| १९३१ | १,२५२ | ०.३६% | +६.४१% |

तक्ता २: जैन लोकसंख्येचा कल (१८८१–१९३१) स्रोत: प्रकाश जैन: २०२४

उदाहरणार्थ जैनबोधकात 'अकाल मरण' या विषयावर मोठी चर्चा झाल्याचे दिसते. या बाह्य कारणांपेक्षा अंतर्गत कारणांची चर्चा मोठ्या प्रमाणात झाली असेही लक्षात येते. यात सर्वात महत्त्वाचा होता **'विधवांचा प्रश्न'**. जनगणना अहवालानुसार, इतर धार्मिक गटांच्या तुलनेत जैन समुदायात विधवांचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त होते. मुंबई इलाख्यात १९११ सालच्या जनगणनेत १००० जैन महिलांमध्ये २४५ महिला विधवा असल्याची नोंद आहे. बालविवाह आणि वृद्ध पुरुषांचे तरुण मुलींशी होणारे विवाह, तसेच विधवा विवाहावरील धार्मिक बंदी (विशेषतः दिगंबरांमध्ये) यामुळे जैन महिलांचा एक मोठा भाग पुनरुत्पादक प्रक्रियेतून बाहेर फेकला गेला होता. बालविवाह, जरठविवाह या सारख्या प्रथांना विरोध करण्याचे आवाहन केले गेले.

**'द जैन गॅझेट'**सारख्या नियतकालिकांनी या विषयांवर समाजसुधारणेची भूमिका घेतली. तसेच या विषयांवर चर्चा करण्यास सुरूवात केली.

जैनबोधक, जैन मित्र या नियतकालीकांनीही या चर्चेत हिरीरीने भाग घेतला. हिराचंद नेमचंद, अण्णासाहेब लठ्ठे, माणिकचंद झवेरी या सारख्या नेत्यांनी सुधारणावादी भूमिकेला पाठींबा दिला. भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेतील सुधारकांनी असा युक्तिवाद केला की, विधवा विवाहास परवानगी दिल्याशिवाय आणि बालविवाह संपवल्याशिवाय समुदायाचा लोकसंख्याशास्त्रीय ऱ्हास थांबणार नाही. असे असले तरी या प्रयत्नांना गतानुगतिक झालेल्या सनातनी गटाकडून मोठा विरोध झाला. जी चर्चा विधवा विवाहावर हिंदू समाजात झाली तीच जैन धर्मातही झाल्याचे दिसते. 'शास्त्रसंमत' काय आहे आणि काय नाही यावर दोन्ही बाजूंनी पुरावे दिले गेले. सुधारणावाद 'शास्त्रकाट्याच्या' चौकटीत अडकून पडला आणि सुधारणा मागे पडल्याचे लक्षात येते. द जैन गॅझेट च्या १९२८च्या अंकात मुनी आत्मारामजी यांच्या सोबतची चर्चा छापली आहे, त्यात मुनी आत्मारामजी यांनी समाजाला अन्य धर्मातून जैन धर्मात येण्यास म्हणजे धर्मांतरास स्वीकारण्याचे आवाहन केले; परंतु समाजातून यास तीव्र विरोध झाल्याचे नमूद केले आहे. याच दरम्यान आपल्याकडेही पंडित पार्टी व बाबू पार्टी (प्रतिगामी असलेली पंडित पार्टी आणि सुधारणावादी अथवा पुरोगामी असलेली बाबू पार्टी) यांच्या शेडबाळ येथे झालेल्या परिषदेत जोरदार वाद झाला होता, त्यास 'शेडबाळचा दंगा' म्हणूनच ओळखले जाते. जरी एखाद्याने जैन धर्म स्वीकारला तरी त्यास घट्ट असलेल्या जातीय उतरंडीत स्थान मिळत नसे व जातीय बहिष्कारास सामोरे जावे लागत असे. मोठ्या प्रमाणात धर्मांतराचा इतिहास असलेल्या समाजाने धर्मांतरास न स्वीकारणे हे विरोधाभासी लक्षण जैन धर्माच्या संख्याशास्त्रीय विस्तारास अडचणीचे ठरत असल्याचे दिसते.

**जागतिक प्रतिनिधीत्व : वीरचंद गांधी**

जैन अस्मितेचा हा वाद केवळ जनगणनेच्या तक्त्यांपुरता मर्यादित नव्हता तर तो नव्या पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या तरुणांनी जागतिक मंचावरही नेला. मुनींच्या प्रवास बंदीमुळे कोणी उपस्थित राहू शकत नसल्याने सन १८९३ मध्ये शिकागो येथे झालेल्या पहिल्या **'जागतिक धर्म परिषदेत'** जैन धर्माचे प्रतिनिधित्व करणारे महुवा (गुजरात) येथील **बॅरिस्टर वीरचंद राघवजी गांधी (१८६४-१९०१)** हे या चळवळीचे प्रमुख नेतृत्व होते. त्यांनी जैन धर्म हा हिंदू किंवा बौद्ध धर्मापेक्षा वेगळा असून तो एक तर्कसंगत, वैज्ञानिक आणि प्राचीन धर्म असल्याचे जगाला पटवून दिले. पौर्वात्य धर्मांना 'बुडबुडे' म्हणून हिणवणाऱ्या शुभवर्तमान-वादी धर्मप्रचारक जॉर्ज टी. पेंटेकोस्ट यांना, त्यांनी दिलेले सडेतोड उत्तर भारतातही चर्चिले गेले. त्यामुळे जैन समाजाला आपली अस्मिता ठामपणे मांडण्याचे बळ मिळाले. जैन असोसिएशन ऑफ इंडियाचे मानद सचिव म्हणून गांधींच्या कार्यात महत्त्वपूर्ण कायदेशीर लढायांचाही समावेश होता. पालिताना तीर्थयात्रेच्या करासाठी १५,००० रुपयांच्या निश्चित वार्षिक रकमेवर मंजुरी मिळवली यातून हजारो गरीब यात्रेकरूंना वैयक्तिक करातून सूट मिळाली. पारंपरिक जैन विद्वत्ता आणि आधुनिक कायदेशीर-प्रशासकीय प्रणाली यांच्यातील दरी सांधण्याच्या त्यांच्या क्षमतेने पुढील दशकांमध्ये वसाहतवादी जनगणनेशी हा समाज कसा जुळवून घेईल याचा एक अंदाज बांधता आला. याच परंपरेत पुढे चंपतराय जैन यांनी पाश्चिमात्य देशांमध्ये जाऊन जैन धर्माची तत्त्वे व ओळख मांडण्याचे कार्य केले. चंपतराय जैन हे स्वतः कायद्याचा अभ्यास केलेले बॅरिस्टर असल्याने त्यांनी जैन धर्मियांचा वैयक्तिक कायदा (personal law) व हिंदू धर्मियांचा वैयक्तिक कायदा भिन्न असल्याने कायदेशीर कामकाजात ही तफावत लक्षात घेण्याची गरज वेळोवेळी अधोरेखित केली आणि वासाहतिक प्रशासनाशी संघर्षही केला. त्यांनी लिहिलेले Jain Law हे पुस्तक या दृष्टीने महत्त्वाचे मानले गेले. जैन धर्माचे अभ्यासक पद्मनाभ जैनी यांच्या मते चंपतराय जैन हे ख्रिश्चन जगतात जैन धर्माचा बचाव करणारे जैन तत्त्व समर्थक होते. 'ईश्वर

न मानणारे हे लोक ख्रिश्चन धर्मात यायला तयार नाहीत' म्हणून निराश झालेल्या ख्रिश्चन मिशनरींना उद्देशून जैन धर्माची तत्त्वे स्पष्ट करणारे पुस्तक लिहिले. जैन हिंदू आहेत की नाहीत या विसाव्या शतकातील वासाहतिक चर्चेत भाग घेऊन जैन हे हिंदू नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन करणारे ते प्रमुख कार्यकर्ते होते. जनगणनेत जैन स्वतःस हिंदू म्हणून सांगतात अथवा फक्त जात सांगतात यामुळे जैन संख्या जनगणनेत योग्य रीतीने प्रतिबिंबित होत नाही, अशा आशयाचे अनेक लेख व भाषणे त्यांनी केली.

**जनगणना राजकारणाचा कळस : १८९१–१९३१**

स्वातंत्र्य चळवळीने वेग घेतल्यावर जनगणना जमातवादी (communal) राजकारणाच्या स्पर्धेचा आखाडा बनली. सन १८९१, १९०१, १९११ आणि १९२१ च्या जनगणनेत जैन समुदायाने त्यांची नोंद कशी केली जाते यावर प्रभाव टाकण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न केले. लोकांना जनगणनेत काय माहिती द्यायची याच्या सूचना केल्या गेल्या. आपली ओळख हिंदू न सांगता जैन सांगावी, फक्त जात न सांगता जैन धर्म सांगावा अशा सूचनाही देण्यात आल्या.

**जनगणना कर्मचाऱ्यांसाठी सूचना**

जनगणना कर्मचाऱ्यांना दिलेल्या सूचना वर्गीकरणासाठी सुरू असलेला छुप्या संघर्षाच्या निदर्शक म्हणून पाहता येतात. सन १९०१च्या जनगणने वेळी धर्मासोबत पंथ नोंदवण्याचे स्वातंत्र्य प्रादेशिक जनगणना अधिकाऱ्यांना दिले गेले. त्यातून कर्मचाऱ्यांना विशेषतः विचारण्यास सांगितले होते की प्रतिसाद देणारी व्यक्ती 'दिगंबर' आहे की 'श्वेतांबर' किंवा 'धोंडिया' (स्थानकवासी) याची नोंद घ्यावी. हा जैन लोकसंख्येचे अधिक 'सूक्ष्म' आकलन करून घेण्याचा प्रयत्न वाटला तरी यामुळे जैन लोकसंख्या विभाजित होण्याची शक्यता होती, अथवा नोंदीत विनाकारण मतभेदांना आमंत्रण देण्यासारखे होते. याविरुद्ध द जैन गॅझेटनी सन १९०० मध्येच म्हणजे जनगणनेच्या आधीच याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली होती. याव्यतिरिक्त, १८९१ च्या जनगणनेत असे नोंदवले गेले होते की अनेक जैन, जेव्हा त्यांना त्यांचा धर्म विचारला जात असे, तेव्हा ते फक्त त्यांची जात (उदा. 'बनिया') सांगत असत. ही नोंद जनगणना कर्मचारी नंतर 'हिंदू' म्हणून गृहीत धरत असत. यामुळे द जैन गॅझेटनी पंथीय नोंद घेण्याला विरोध केला. परंतु याची दखल घेतली गेली नाही.

**हटन अहवाल आणि १९३१ चे हिंदुत्वीकरण**

जे. एच. हटन यांच्या निर्देशनाखाली १९३१ची जनगणना घेण्यात आली. ही जनगणना वसाहतवादी काळातील सर्वात व्यापक आणि वादग्रस्त मानली जाते. या काळात, हिंदू महासभेने राजकीय सुधारणांच्या पार्श्वभूमीवर हिंदूंची संख्या वाढवण्यासाठी भारतीय वंशाचे सर्व धर्म 'हिंदू' म्हणून नोंदवण्याची सक्रिय मोहीम चालवली होती. हटनच्या अहवालात या 'उत्स्फूर्त प्रचाराची' नोंद होती. या प्रचारामागे जैन, शीख, बौद्ध आणि आदिवासींना लक्ष्य केले होते. त्यांना स्वतःला हिंदू म्हणून नोंदवण्यासाठी प्रोत्साहित केले गेले.

हटन यांनी सामाजिक किंवा राजकीय लाभासाठी आपली जनगणना स्थिती बदलू इच्छिणाऱ्या समुदायांकडून होत असलेल्या प्रयत्नांवर 'प्रतिनिधीत्वाचा त्रासदायक प्रवाहावर' असे संबोधून त्यांच्यावर विशेष टीका केली. त्यांनी नोंदवले की आदिवासी नोंदी ३३% पर्यंत कमी होत होत्या कारण ते अतिउत्साही हिंदू कर्मचाऱ्यांच्या प्रभावामुळे हिंदुत्वामध्ये 'गिळले' जात होते. जैनांनाही अशाच दबावांचा सामना करावा लागला. हटन यांनी आपल्या जनगणना अहवालात नोंदवले आहे की अनेक जैन स्वतःची नोंद हिंदू म्हणून करू इच्छितात, त्यांनी जनगणना कर्मचाऱ्याना अशा नोंदी करण्याची सूचना केली आणि तळटीपेत स्वतःची नोंद हिंदू करू इच्छिणाऱ्या जैनांची संख्या नोंदवावी. अर्थात, प्रत्यक्ष काम करताना अनेक अर्ज भरून घेणे त्यांच्या वेगळ्या नोंदी करणे, ही किचकट प्रक्रिया न पाळता सरसकट हिंदू म्हणून नोंद घेणे सोपे होते. सन १९३१च्या जनगणनेत जैन लोकसंख्या वाढीच्या

दरात किंचित वाढ (+६.४१%) नोंदवली गेली असली तरी, संशोधकांचा युक्तिवाद आहे की ही लोकसंख्याशास्त्रीय वाढ नसून, प्रत्येक जैन व्यक्तीची योग्य नोंद केली जावी यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तो परिणाम होता.

**मुंबई प्रांत : वादाचे केंद्रस्थान**

वसाहतवादी सत्तेसोबतच्या जैन समुदायाच्या सहभागास मुंबई प्रांताने भक्कम आधार दिला होता. ब्रिटीश सत्तेने निर्माण केलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या सोयीमुळे जैन समुदायाच्या लोकांना व्यापार करण्यासाठी सर्वात सुरक्षित ठिकाण प्राप्त झाल्याने अनेक जैन व्यापारी या शहरात व प्रांतात स्थायिक झाले होते. मुंबई शहर हे श्रीमंत जैन व्यापाऱ्यांचे माहेरघर झाले.

**शहरीकरण आणि आर्थिक शक्ती**

जैन हा भारतातील सर्वात शहरी समुदाय होता. सन १९०१ पर्यंत, ३०% जैन शहरांमध्ये राहत होते, आणि ही संख्या १९४१ पर्यंत ४१.४% पर्यंत पोहोचली. मुंबई शहरात, जैन व्यापारी अभिजात वर्ग कापूस आणि सराफा व्यापाराचा महत्त्वपूर्ण हिस्सा नियंत्रित करत होता.

| जनगणना वर्ष | शहरीकरण दर (जैन) | शहरीकरण दर (सर्वसाधारण) |
|---|---|---|
| १९०१ | ३०.०% | ~१०% |
| १९४१ | ४१.४% | ~१४% |
| १९८१ | ६४.०% | ~२३% |
| २००१ | ७५.०% | ~२८% |

तक्ता ३ : जैन समुदायाचा शहरीकरणाचा कल, स्रोत : प्रकाश जैन, २०२३

ही आर्थिक शक्ती म्हणून पाहिल्यास आनंदजी कल्याणजी पेढीसारख्या व्यापारी शक्तिंचा उदय या पार्श्वभूमीवर पाहता येतो. या पेढीने तीर्थक्षेत्रांमध्ये समुदायाच्या हिताचे व्यवस्थापन केले आणि कायदेशीर विवादांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व केले.

**शिक्षण आणि साक्षरता**

मुंबई प्रांतातील जैन लोकांमध्ये उच्च साक्षरता दर असणे, हे जनगणनेच्या चर्चांमध्ये भाग घेण्याच्या त्यांच्या क्षमतेचे एक महत्त्वाचे कारण होते. सन १८९१ मध्ये, सामान्य लोकसंख्येतील पुरुष साक्षरता दर कमी असतानाही, ५३.४% जैन पुरुष 'साक्षर' म्हणून नोंदवले गेले होते. या शैक्षणिक स्थितीमुळे जैन समुदायाला स्वतःचे विद्वान, वकील आणि पत्रकार मिळाले. त्यांनी इंग्रजी भाषेत वसाहतवादी कथनाना (narratives) आव्हान दिले. तथापि,स्त्री-पुरुष यांची शैक्षणिक असमानता या जनगणनेतून स्पष्टपणे पुढे आली. सन १८९१ मध्ये केवळ १.४% जैन महिला साक्षर होत्या, ही वस्तुस्थिती समकालीन सुधारकांनी बालविवाह-सारख्या 'सामाजिक वाईट गोष्टीं'चे मूळ कारण म्हणून अधोरेखित केली होती. पुढे सर्व नियतकालिकांनी या आकडेवारीचा आधार घेऊन स्त्री शिक्षणावर भर दिला. अनेक ठिकाणी जैन श्राविकाश्रम उघडण्यात आले. (याची नोंद सन्मतिच्या मागील जोड अंकात घेतली आहे).

**स्वातंत्र्याकडे संक्रमण : १९४१-१९५१**

ब्रिटिश राजवटीचे अंतिम दशक आणि भारतीय प्रजासत्ताकाची पहिली काही वर्षे जैन अस्मितेचे दृढीकरण झाले असले, तरी जुन्या चर्चा नव्या स्वरूपात टिकून राहिल्या.

**फाळणी आणि विस्थापन**

सन १९४१ची जनगणना दुसऱ्या महायुद्धाच्या गोंधळात घेण्यात आली होती आणि तिची आकडेवारी केवळ अंशतः प्रकाशित झाली. सन १९४७ मध्ये भारताच्या फाळणीमुळे सिंध आणि पंजाबमधून मोठ्या संख्येने जैन लोकांचे नव्याने स्थापन झालेल्या भारतीय प्रजासत्ताकात स्थलांतर झाले. प्रथमच जवळजवळ संपूर्ण जैन समुदाय एकाच राजकीय अधिकारक्षेत्राखाली आला.

**स्वतंत्र भारताची १९५१ची जनगणना**

सन १९५१ची जनगणना ही जनगणना कायदा (१९४८) अंतर्गत घेण्यात आलेली पहिली जनगणना होती आणि ती नव्या राष्ट्राच्या धर्मनिरपेक्ष आकांक्षा दर्शवणारी होती. भारताची लोकसंख्या

अंदाजे ३६१ दशलक्ष (३६.१ कोटी) मोजली गेली. यात जैन लोकांची संख्या १,६६१,००५ (एकूण ०.४३%) होती.

धार्मिक गट (१९५१)

| धार्मिक गट | एकूण लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ३०३,६७५,०८४ | ८४.१% |
| इस्लाम | ३५,३८६,६३३ | ९.८०% |
| ख्रिश्चन धर्म | ८,३०५,०२६ | २.३०% |
| शीख धर्म | ६,८२४,५६५ | १.८९% |
| बौद्ध धर्म | २,६७२,०५१ | ०.७४% |
| जैन धर्म | १,६६१,००५ | ०.४३% |
| इतर/आदिवासी | १,५५२,६७८ | ०.४६% |

माहिती स्रोत : जनगणना अहवाल १९५१

१९५१च्या जनगणनेत रिस्ले युगातील विस्तृत जाती वर्गीकरण काढून टाकले असले तरी जैन अस्मितेचा (identity) मूलभूत प्रश्न कायम राहिला. भारतीय संविधानाने जैन लोकांना काही संदर्भात एक वेगळा धार्मिक समुदाय म्हणून मान्यता दिली, तरी कलम २५ अंतर्गत, सामाजिक सुधारणा आणि वैयक्तिक कायद्यांच्या हेतूने त्यांना 'हिंदू'च्या चौकटीतच समाविष्ट केले गेले. हे 'कायदेशीर एकात्मीकरण' वसाहतवादी जनगणना चर्चेचाच थेट वारसा होता. यात राज्यसत्तेने एका विशिष्ट अल्पसंख्याकांना मान्यता देणे आणि एकात्मिक 'भारतीय' अस्मितेच्या राष्ट्रवादी प्रेरणेत संतुलन साधण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे आज जनगणना डिजिटल झाली तरी मूळ प्रश्न अनुत्तरीत राहिले.

**सामाजिक–कायदेशीर वारसा आणि आधुनिक विचार**

सन १८७२–१९५१च्या लोकसंख्या विषयक चर्चांनी जैन समुदायाच्या सामाजिक संरचनेवर कायमचा ठसा उमटवला. २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या 'लोकसंख्याशास्त्रीय भीती' ने सामाजिक सुधारणांना यशस्वीपणे गती दिली. सन १९५५च्या हिंदू विवाह कायद्यानंतर बहुपत्नीत्व प्रथेस बंदी घातली आणि विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली. यानंतर जैन लोकांमध्ये विधवांचे 'असामान्य' प्रमाण हळूहळू कमी झाले. सन २०११ च्या जनगणनेपर्यंत ते 'सामान्य' पातळीवर पोहोचले. तथापि, 'कमी मोजणी' (under-enumeration) वरील वाद आजही सुरू आहे. लोकसंख्याशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ नमूद करतात की २०व्या शतकाच्या उत्तरार्धातही हजारो जैन लोकांना दोन धर्मांच्या ऐतिहासिक जवळीकीमुळे हिंदू म्हणून नोंदवले जात होते. सन १९९०च्या दशकात आणि २०००च्या दशकात समुदायव्यापी एकत्रीत प्रयत्नांद्वारे जवळजवळ ७००,०००हून अधिक 'लपलेले' अथवा आपली ओळख जैन न सांगता अन्य सांगितलेले जैन जनगणनेत अचूकपणे वर्गीकृत केले गेले. ही आधुनिक घटना वीरचंद गांधी आणि द जैन गॅझेटच्या संपादकांची एक शतकापूर्वी झालेल्या संघर्षाची आठवण करून देणारी होती.

**निष्कर्ष–**

वसाहतवादी भारतातील जैन लोकसंख्या चर्चेचा इतिहास हा फक्त संख्यात्मक आढावा नाही. एका अल्पसंख्याक समुदायाने वेगाने बदलणाऱ्या राजकीय परिस्थितीत आपले स्थान अधोरेखित करण्याच्या प्रयत्नांचे ते कथन आहे. हा संघर्ष वसाहतवादी 'ज्ञानाच्या तंत्रज्ञाना'शी केलेल्या सालंकृत सहभागाद्वारे परिभाषित केला गेला. ब्रिटिश जनगणनेच्या ब्राह्मणवादी पूर्वग्रहांना आव्हान दिले गेले, जैनांच्या प्रागैतिहासिक श्रमण उत्पत्तीचा दावा करून आणि विधवा व बालविवाहाच्या सामाजिक संकटांना संबोधित करून, जैन लोकांनी एका अस्पष्ट पारंपारिक 'संप्रदाया'मधून एक स्व–जागरूक आणि कायदेशीररित्या मान्यता प्राप्त जागतिक धर्मात रूपांतर होण्याची ही प्रक्रिया जनगणनेच्या वसाहतवादी प्रशासकीय तंत्रास एका धार्मिक, गुंतागुंतीच्या समुदायाने दिलेल्या प्रतिसादातून घडलेली दिसते. यातून 'जैन धर्म' असा एक नवा कोटिक्रम मिळाला. जैन धर्मातील जातींना एक नवी ओळख प्राप्त झाली. त्यातून जाती अस्मिता आणि धर्म अस्मिता अशी कसरत सुरु झालेली दिसते.

बेनेडिक्ट अँडरसन यांनी ज्यास काल्पनिक समुदाय (imagined community) म्हणून संबोधले अशा या अस्मितांभोवती जनगणनेच्या माध्यमातून एक प्रत्यक्षातील समुदाय अस्तित्वात आला. सन १८७२ ते १९५१ पर्यंतचा काळ अशा प्रकारे आधुनिक जैन अस्मिता (identity) घडवण्याची एक कसोटी ठरला.

**संदर्भ**


१. द जैन गॅझेट, १९००, १९०५, १९१४ सालचे अंक.

२. दानवीर माणिकचंद्र, ब्र. शीतलप्रसाद, १९१८, मुलचंद किसनदास कापडिया, सुरत.

३. जैन लॉ, १९२६, द देवेंद्र प्रिंटींग आणि पब्लिशिंग क. लि., मद्रास

४. जैन मित्र, १९०६ चे अंक.

५. जैन हितैषी, १९१९-२० सालचे अंक.

६. जैन आणि हिंदू, तात्या चोपडे, १९४५, श्री वीर ग्रंथमाला, सांगली.

७. सेंसस ऑफ इंडिया, जे. एच. हटन, १९९६, ज्ञान पब्लिकेशन हाउस, न्यू दिल्ली.

८. जैन कम्युनिटी अ सोशल सर्वे, विलास संगवे, १९५९, पॉप्युलर बुक डेपो, बॉम्बे.

९. https://mospi.gov.in/sites/default/files/national_data_bank/census_data_pro/Religion-2001/Introduction_2001_religion.pdf

१०. https://isjs-newsletter.in/Journal/2024 /October December/1_ Prakash C_Jain. pdf

११. महाराष्ट्रातील प्रबोधन आणि जातीप्रभूत्त्व, उमेश बगाडे, २००६, सुगावा प्रकाशन, पुणे.

१२. https://jainastudies.soas. ac.uk/ijjs/ijjs-1901-2023.pdf

१३. htt{s://encyclo{ediaofjainism.com/status-of-contem{orary-jain-community/

१४.https://isjs.in/wp-content/uploads/2023/06/Prakash-Jain.pdf


*****

---

## सन्मति मार्च-एप्रिल महिला विशेषांकाबद्दल उमटलेल्या भावना

आजच्या युद्धजन्य परिस्थितीत संपूर्ण विश्व संकटात सापडले आहे. अशावेळी जैन दर्शनात, जिनवाणी मातेजवळ एवढे सामर्थ्य आहे की, कोणतीही हिंसा न होऊ देता, कोणाचे मन न दुखवता फक्त दृष्टिकोनात बदल करून सर्व परिस्थितीवर मात करता येते.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रकाशित झालेला मार्च-एप्रिलचा सन्मति मासिकाचा अंक अतिशय प्रभावशाली झालेला आहे. अगदी सुरुवातीपासून म्हणजे ब्राम्ही आणि सुंदरी यांच्या कार्यापासून तर, धार्मिक शिक्षण देणाऱ्या जसे पूज्य आर्यिका पार्श्वमती माताजी, श्रध्देय गजाभून, श्रध्देय कंकुमावशी, पं. सुमतीबाई शहा, पं. विद्युल्लता भून, पं. मंजुळाताई रुईवाले आदि विदुषीरत्नांनी केलेले अमूल्य कार्य, तसेच सद्यपरिस्थितीत विदुषी पं. विजयाताई भीसीकर यांचे बहुमूल्य योगदान, अनेक गांवागांवातून सुरू असलेले स्वाध्यायवर्ग, पाठशाळा यात योगदान देणाऱ्या महिलावर्गाचा उल्लेख सन्मति अंकात प्रकाशित करून त्यांचा गौरवच केला आहे.

जिनवाणीचा प्रचार-प्रसार करणाऱ्या महिलांचा गौरव करण्याचा दृष्टिकोन समोर ठेवून संपादक मंडळाने निर्माण केलेला हा विशेषांक सर्वांना प्रेरणादायी असाच झाला आहे. सर्वच लेखकांनी या अंकातील व्यक्तिरेखा समर्थपणे साकार केल्या आहेत. त्याबद्दल सर्वच संपादक मंडळाचे अभिनंदन व आभार!

प्रेषक :- **सौ. मंगला निरंजन देवलसी, अकोला**

# सन्मति (मार्च–एप्रिल : २०२६ ) अंकाबद्दलचे मनोगत

जय जिनेंद्र!

एक लेखिका म्हणून सन्मतिचा महिला दिन विशेषांक हातात घेऊन वाचण्याची उत्सुकता होती. अंक हातात आल्याआल्या पूर्ण वाचून झाला... पण मन भरलेच नाही.... परत एकदा.... परत एकदा... अशी वाचनाची तीन आवर्तने झाली. आपल्या गौरवशाली, अभिमानास्पद इतिहासाचा आढावा वाचून आनंद अनुभवला.

संपादकीय लेखामधून डोकावणारे विचार नेहमीच प्रभावी आणि चिंतनशील असतात. या अंकातील संपादकीय तर महिला कर्तृत्वावर विशेष मोहोर उमटविणारे आहे! त्यानंतरचे काही लेख पुनर्वाचनाचा आनंद प्रगटविणारे, तर श्री. मडकर सर यांचा संशोधनपूर्ण लेख वाचून या विषयाची व्याप्ती लक्षात आली.

सौ. वंदनाताईनी केलेले पुस्तकाचे रसपूर्ण रसग्रहण, त्यांची शब्दांची हळुवारता ही संपूर्ण पुस्तक विषय उलगडणारी ठरते आहे.

मासिक सन्मतिचा आणि माझा, मला लिहिलेलं आकलन व्हायला लागलं तेव्हापासूनचा संबंध ! आणि आता एक लेखिका म्हणून गेल्या काही वर्षातला आलेला जवळचा संबंध !

पट्टमहादेवी शांतला या लेखमालेच्या पुढच्या भागाची चर्चा सुरु असतांना महिला विशेषांकाचा विषय निघाला. नागपुरातील जुन्या काळातील स्वाध्याय क्षेत्रात कार्य केलेल्या महिलांबद्दल काही माहिती मला विचारली असता मला माहिती असलेली नावे एकापाठोपाठ मी सांगितली आणि चाणाक्ष संपादकांनी संपूर्ण लेखाची जबाबदारी माझ्याकडे सोपविली! माझादेखील आवडता विषय असल्याने मी ती स्वीकारली.

**ज्योतीने ज्योत उजळते!** या माझ्या लेखाच्या निमित्ताने बऱ्याच जणांशी बोलणे झाले. अनेकांच्या अनेक जुन्या आठवणी जागृत झाल्या. पूर्वजांच्या स्मृतींना, त्या काळाला, मनःचक्षूंसमोर येतांना तर किती बोलू असे काहींना झाले...! माझा जवळपास तीन आठवड्यांचा कालावधी याच विषयाभोवती फिरत राहिला. तरीदेखील काहींचा उल्लेख राहून गेला होता. सोशल मीडीयामुळे ही माहिती माझ्यापर्यंत येत गेली. त्यामुळेच राहिलेल्या काही त्रुटींची पूर्तता या मनोगताच्या माध्यमातून करतांना परिपूर्णतेकडच्या पावलाचा आनंद मी अनुभवते आहे.

सामूहिक शास्त्र वाचन या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या जुन्या काळातील महिला म्हणजे **श्रीमताबाई चवरे !** कारंजा-लाड येथे या कार्यरत होत्या. त्या काळात या स्वतः सरकारी अध्यापन क्षेत्रात काम करीत असल्याने गावोगावी त्यांना जावे लागे. स्वतःचे शुद्ध खानपान, सोवळे सांभाळून नोकरी करीत, त्यांनी वाणीवर प्रभुत्व मिळविले. पुढे कारंजाच्या बालात्कार जैन मंदिरामध्ये त्या स्वाध्यायवर्ग घेत असत.

कारंजातीलच **सौ. मैनाबाई जयकुमारजी भीसीकर** या काष्ठासंघ मंदिरात चालणाऱ्या सायंकालीन स्वाध्यायात येणाऱ्या शंकांचे निरसन करण्यात अग्रेसर होत्या.

समाजातील आताच्या ज्येष्ठ सदस्या **श्रीमती उषाताई जैन (इंदौर)** म्हणजे त्यावेळच्या **कु. उषा मोतीलालजी चवरे (कारंजा)** या कंकुबाई श्राविकाश्रमाच्या विद्यार्थिनी! संस्थेच्या प्रारंभिक काळात धार्मिक व अन्य अध्यापनाची जबाबदारी सांभाळून विद्याऋण फेडण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

तसेच श्री कंकुबाई श्राविकाश्रममध्ये सध्या कार्यरत असणाऱ्या **सौ. अपर्णा प्रमोद चवरे** यांचे मुलींवरील स्वाध्याय संस्कारात मोठे योगदान आहे.

नोकरी, व्यवसायानिमित्त मुले वेगवेगळ्या गावी गेलीत की, आईवडिलांनाही नव्या गावी

नव्याने सुरुवात करावी लागते. अशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या **श्रीमती कांताताई जगदीशजी संगई** या एक! अंजनगाव सोडून अमरावतीमध्ये वास्तव्यास आल्यानंतर गावातल्या मंदिर आणि स्वाध्यायात पडलेले अंतर, शहरातल्या दूर दूरच्या अंतरांचा बाऊ न करता भरून काढणाऱ्या ! अमरावतीच्या मध्यवर्ती असणाऱ्या श्री महावीर मंदिरामध्ये दर गुरुवारी स्वाध्याय वर्गाची सुरुवात करून चारही अनुयोगांचे विविध ग्रंथ सरळ, सोप्या भाषेत समजावून सांगत समाजात स्वाध्यायाची गोडी निर्माण करण्यात त्या यशस्वी ठरल्या. स्वाध्यायाला आलेली गती कोरोनामुळे मंदावते की काय, असे वाटत असतांना ऑनलाईनशी हातमिळवणी करून दुप्पट वेगाने कार्यान्वित केली! सोबतच समयसार सारख्या ग्रंथाचे मराठीतून काव्य लेखन, श्रुतस्कंध व्रताची मराठी पूजा व अन्य काही कृतींच्या रचना त्यांनी केल्या आहेत. अशी मोलाची जिनवाणी सेवा त्यांचेकडून घडली आणि अजूनही घडतेच आहे.

इंग्लिश मिडियमच्या काळात पाठशाळांना लागलेली गळती, बालपणी मिळणाऱ्या धार्मिक संस्कारांपासून दूर चाललेली पिढी धर्माशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम करण्याच्या प्रयत्नात अग्रेसर असणारी पुण्याची युवा स्वाध्यायी म्हणजे पूजा परतवार !

मूळची कारंजा लाड येथील पूजा खंडारे! इंजिनिअरिंग क्षेत्रात उल्लेखनीय करिअर असणारी बुद्धिमान युवती! पुण्याला सुरुवातीला घराजवळील मंदिरात पाठशाळा सुरू करून स्वस्थ बसली नाही, तर आधुनिक युगाप्रमाणे डिजिटल पाठशाळांचे जाळे विणण्यात ती यशस्वी ठरली आहे. बदलत्या काळानुसार आवश्यक अशा नवीन पद्धतींप्रमाणे पाठशाळांचा कोर्स, सिलॅबस तिच्या टीमने याप्रकारे डिझाईन केला आहे की, आज पाचशेच्या वर पाठशाळांचे यशस्वी संचालन ती करते आहे! तिचे हे कार्य एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे म्हणावे लागेल.

नागपूरमधे गेल्या तीन चार वर्षांपासून श्री शांतिसागर पाठशाळा सुचारू रूपाने चालविण्याचे श्रेय जाते, **सौ. अलका खंडारे** यांचेकडे ! शनिवार–रविवारची ही पाठशाळा, ज्ञानवर्धन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे आपले वेगळे स्थान निर्माण करीत आहे .

ज्योतीने ज्योत उजळते..... लेखाच्या निमित्ताने प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे आपल्या भावना गहिवरल्या स्वरात माझ्यापर्यंत पोहोचविणाऱ्या अनेकांमुळे मला आंतरिक समाधानाची अनुभूती होते आहे. बऱ्याच महिलांनी त्यांच्या भावना लेखणीतून प्रगट केल्या आहेत, स्वतःचा आदरभाव व्यक्त केला आहे.

मला लेखनकलेची रुची असली, तरी सातत्याने लेखनास प्रोत्साहित करणाऱ्या आदरणीय प्रज्ञाताई आणि श्री. नेमिनाथजी शास्त्री सर यांना विशेषत्वाने धन्यवाद, कारण वेळेचा अलार्म सतत वाजला नसता तर माझा लेख पूर्णत्वाकडे कदाचितच गेला असता!! प्रज्ञाताईंचे शब्द माझ्या हातातील लेखणीला शाईप्रमाणे आधारभूत असतात, त्यामुळे या लेखाच्या सगळ्या श्रेयाचा भार त्यांच्याकडे सोपविला तरच मला उतराई झाल्यासारखे वाटेल!

आपण सर्वांनी भरभरून दिलेला प्रतिसाद नित्य सामूहिक स्वाध्याय रूपाने प्रगटावा, या भावनेसह मी सर्वांना मनापासून धन्यवाद देते.

प्रेषक – **विपुल खेडकर, नागपूर**


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......


**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०
**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील
८७६७५४१७१०

# वाचू आनंदे, लिहू नेटके!

पुस्तकावर बोलू काही...!

पुस्तक समीक्षण...




## बारोमास : शेतकरी जीवनाची वास्तववादी शोकांतिका

लेखक : डॉ. सदानंद देशमुख

**पेरलं तर पिकत नाही आणि पिकलं तर विकत नाही**

विदर्भातील ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांची विवंचना, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि बदलत्या काळातील संघर्ष यांचे हृदयस्पर्शी वास्तव मांडणारी, मराठी साहित्यातील सन २००४ चा भारत सरकारचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी म्हणजे डॉ. सदानंद देशमुख लिखित बारोमास!

सुमारे ३५० पृष्ठांची ही कादंबरी लेखकाने फक्त तीस दिवसात लिहून पूर्ण केली आहे. बारोमास या कादंबरीच्या आतापर्यंत सहा आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

**मातीशी नाळ जुळलेला लेखक...**

बुलढाणा जिल्ह्यातील, चिखली तालुक्यातील, अमडापूर येथे नामदेवराव व पार्वताबाई या सर्वसामान्य शेतकरी दांपत्याच्या कुटुंबात दि. ३० जुलै १९५९ रोजी सदानंद देशमुख यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. (मराठी), बी.एड. असून त्यांनी कृषीनिष्ठ मूल्य जाणीवांचा अभ्यास हा विषय घेऊन पीएच.डी. उपाधी प्राप्त केली आहे. कथा, कविता, ललित गद्य आणि कादंबरी अशा साहित्याच्या विविध क्षेत्रांत लेखकाने लीलया संचार केला आहे. लेखकास मातीचा शब्दशिल्पकार असे सुद्धा संबोधले जाते.

सन २०१६ मध्ये चंद्रपूर येथे आयोजित ६५व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद श्री. देशमुख यांनी भूषविले होते.

**भावविश्व उलगडणाऱ्या व्यक्तिरेखा**

कादंबरीतील कथानक, विचार आणि भावना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य कादंबरीतील व्यक्तिरेखा करीत असतात. 'बारोमास' या कादंबरीमध्ये, वाचकांना जवळच्या वाटणाऱ्या, अगदी मनाला भिडणाऱ्या व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटल्या आहेत. एकनाथ, अलका, मधु , शेवंता माय, सुभानराव, तेजराव खपके, वारे बाई, दगडू महाकाळ अशा व्यक्तिरेखा, मातीचा गंध, संघर्षाची झळ आणि ग्रामीण वास्तवाची वेदना आपल्या सोबत घेऊन येतात.

**शेतकरी जीवनाच्या आक्रोशातून जन्मलेले कथानक**

बारोमास ही विदर्भातील सांजोळ गावातील तनपुरे कुटुंबाच्या जीवनसंघर्षाची अत्यंत हृदयद्रावक आणि वास्तववादी कहाणी आहे.

शिक्षण घेऊनही नोकरी न मिळालेला एकनाथ, स्वप्नभंग झालेली अलका, कष्टाने झिजलेली शेवंता माय, मातीवर जीव ओवाळून टाकणारे सुभानराव आणि दिशाहीन भरकटलेला मधूड्या सर्वांच्या आयुष्यातील संघर्षातून ही कथा पुढे सरकते. प्रत्येक पात्र हे ग्रामीण जीवनातील वेदना आणि वास्तवाचे जिवंत प्रतीक बनते.

दुष्काळ, सावकारी कर्ज, भ्रष्टाचार, बेरोजगारी, शेतमालाचे कोलमडलेले दर आणि कौटुंबिक ताणतणाव यामुळे हे कुटुंब सतत संकटांच्या गर्तेत अडकलेले दिसते. शिक्षण असूनही नोकरी न मिळणे, शेतीत सतत नुकसान होणे आणि आर्थिक विवंचना यामुळे त्यांच्या जीवनातील निराशेचे सावट अधिक गडद होत जाते.

कादंबरीची सुरुवात एकनाथच्या चिंतनातून

होते आणि नानूआजाच्या भूतकाळातील आठवणींमधून शेतीतील बदलांचा प्रवास उलगडतो. आधुनिक शेतीपद्धती, कर्जाचा वाढता भार आणि उत्पादनखर्च यामुळे शेतकरी अधिकच अडचणीत सापडतो. शेती हे उपजीविकेचे साधन न राहता संघर्षाचे कारण बनते.

कथानक पुढे जात असताना कुटुंबातील मतभेद, अपेक्षाभंग, व्यसनाधीनता, हिंसा आणि आत्महत्येसारखी भीषण वास्तवता समोर येते. एकीकडे एकनाथ शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून संघर्षाची दिशा स्वीकारतो, तर दुसरीकडे मधू चुकीच्या मार्गाला वळतो.

अशा प्रकारे बारोमास ही कादंबरी केवळ एका कुटुंबाची कथा नसून संपूर्ण शेतकरी समाजाच्या वेदना, आक्रोश आणि अस्तित्वाच्या लढ्याचा जिवंत दस्तऐवज आहे.

**भाषेतील सौंदर्य आणि सामर्थ्य**

✻ या कादंबरीत लेखकाने प्रमाण भाषेसोबत अस्सल वऱ्हाडी बोलीचा सुरेख मिलाफ साधला आहे. निवेदनासाठी प्रमाण भाषेचा आणि संवादासाठी वऱ्हाडी बोलीभाषेचा उपयोग केला आहे. त्यामुळे प्रत्येक संवाद जिवंत वाटतो.

✻ लेखकाची भाषाशैली साधी असूनही योग्य उपमा, म्हणी, वाक्प्रचार आणि प्रवाही शैली यांच्या वापरामुळे अत्यंत प्रभावी व भावपूर्ण वाटते.

✻ 'बारोमास' ही कादंबरी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्र उलगडून दाखवते.

✻ कृषिप्रधान असलेल्या आपल्या देशात शेतकऱ्यांची प्रत्येक पातळीवर कशी मुस्कटदाबी व कोंडी होते, याचे यथार्थ वर्णन यामध्ये केले आहे.

✻ भ्रष्टाचार, राजकारण आणि शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक अशा समाजव्यवस्थेवर लेखकाने प्रखर भाष्य केले आहे.

✻ शिक्षण, बेरोजगारी आणि दिशाहीन तरुणाईचे वास्तव कादंबरीमध्ये दर्शवले आहे.

✻ कोणतीही अतिशयोक्ती न करता वास्तव जीवन जसे आहे तसे मांडले आहे.

✻ आपल्या लेखनातून लेखक वाचकांना संदेश देऊ इच्छितात की, जुन्या पिढीने नवीन पिढीशी आणि नवीन पिढीने जुन्या पिढीशी जुळवून घेतले पाहिजे.

✻ मातीशी नाळ जोडलेली माणसे कितीही संकटे आली तरीही खंबीरपणे उभी राहतात.

बारोमास ही साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवलेली उत्कृष्ट कलाकृती असून, वाचकाला विचार करायला भाग पाडणारी कादंबरी आहे.

या कादंबरीने लेखकांना बारोमासकार अशी ओळख दिली आहे.

या कादंबरीवर बारोमास नावाचा हिंदी चित्रपट देखील प्रदर्शित झाला असून, मराठी भाषेमध्ये नाटकाचे यशस्वी प्रयोग झाले आहेत.

या कादंबरीची अनेक भाषांमध्ये भाषांतरे सुद्धा झालेली आहेत.

'बारोमास' कादंबरीने ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण केल्यामुळे वाचकांच्या मनात तिने विशेष स्थान निर्माण केले आणि ती सर्वदूर लोकप्रिय ठरली आहे.

✻✻✻✻✻✻

**सौ. उज्वला इंगळे,** एम. ए. (मराठी), बी.एड.
सहाय्यक शिक्षिका
**सौ. अनुराधा केळतकर,** एम.ए. (इंग्रजी), बी.एड.
सहाय्यक शिक्षिका,
कंकुबाई माध्यमिक कन्या शाळा, कारंजा (लाड)

**वर्गणीदारांना विनंती...**
**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

**प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित**

# श्री बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

## : कर्नाटक विभाग :

**१) ए. एस. पाटील हायस्कूल, स्तवनिधी**

**शाळेचा निकाल – १००%**

१) पृथ्वीराज विजय सावंत ९७.६०%
२) अनुष्का सुकुमार माने ९५.५२%
३) सुमित नरसगोंडा पाटील ८९.९२%

**२) धनपाल खेमलापुरे हायस्कूल, बेलद बागेवाडी**

**सीबीएससी शाळेचा निकाल – १००%**

1) Pallavi Bhovi 93.80%
2) Manasi Shivanagol 86.60 %
3) Aishwarya Naik 83.00%

**३) एस. जे. गर्ल्स हायस्कूल, तेरदाळ**

**शाळेचा निकाल – १००%**

१) सौम्या हरवी ९९.२०%
२) वर्षा महेंद्रकर ९७.६०%
३) संजना माळी ९५.३६ %

**४) एस. एम. हायस्कूल, तेरदाळ**

**शाळेचा निकाल – १००%**

१) प्रज्वल हळींगळी ९६.४८%
२) ऋषिकेश वाळके ९२.९६%
३) अच्युत गुरव ९२.३६%

**५) पार्श्वमती विद्यालय, अकोळ**

**शाळेचा निकाल – १००%**

१) कु. रिया रूपक कानडे ९४.२४ %
२) कु. अनुष्का शिवगौडा पाटील ९१.३६%
३) कु.झरीन यासीन चौधरी ९०.७२%

**६) सन्मति विद्यामंदिर, सिदनाळ**

**शाळेचा निकाल – १००%**

१) सुरक्षा सुधाकर जाधव ८५.७६%
२) शिवानी सतीश नलवडे ७७.१२ %
३) सानवी अनिल दाभाडे ७५.२० %

**७) भरतेश विद्यालय, बेल्लद बागेवाडी**

**शाळेचा निकाल – ९८.००%**

(३२५ पैकी ३१८ विद्यार्थी उत्तीर्ण)

1) Shreyansh Khemalapure 99.04%
Soumya Kukanur 99.04%
2) Shilpa Hanamannavar 98.08%
3) Archana Karikatti 97.76%

**८) J. V. Mandal PU College, Terdal**

**कॉलेजचा निकाल – ९८.७३%**

१) संगीता गाडदर (वाणिज्य) ९८.८३%
२) ओंकार अमात्यनवर (वाणिज्य) ९८.१६%
३) लक्ष्मी बडीगेर (कला) ९८.००%

**९)Bhartesh PUCollege, BelladBagewadi**

**कॉलेजचा निकाल – ९२.५९%**

१) कावेरी पुजारी (कला) ९५.३३%
२) वीणा पाटील (कला) ९४.५०%
३) गोविंदराज हंजी (विज्ञान) ९४.३३%

## भद्र - भारती

*** केवळ लिहिता, वाचता येण्याने किंवा परीक्षा पास होण्याने जीवन सुखी होत नसून आपले शील उच्च बनण्याचे व सद्‌गुण संपादन करण्यानेच मनुष्यजन्मात खऱ्या सुखाची प्राप्ती होते.**

*** ज्ञानदानासारखे दुसरे थोर व कल्याणकारी दान नाही. म्हणून ज्ञानाची उपासना मुलांनी अधिक आस्थेने करावी व अध्यापक तथा कार्यकर्त्यांनीही आपले ज्ञान सतत वर्धिष्णू ठेवावे आणि मुलांच्या ज्ञानवृद्धीसाठी सहायक बनावे ही अपेक्षा आहे. ते एक महत्त्वाचे जीवन–कार्य समजावे.**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित
# श्री बाहुबली विद्यापीठातर्फे संचालित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

## : पश्चिम महाराष्ट्र विभाग :

**१) जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर**

**शाळेचा निकाल – १००%**

१) संदेश बाळू बुबणे १००%
२) रिया पंकज काडगे ९९.६०%
३) अन्विक्षा अनमोल पाटील ९७.८०%

**२) सन्मति विद्यालय, तारदाळ**

**शाळेचा निकाल – ९८.०३%**

१) मयुरी कृष्णात थोडसरे ९७.००%
२) वेदिका सुरेश नर्मदे ९६.६०%
३) निदा रमजान शेख ९६ ४०%

**३) एम. जी. शहा विद्यामंदिर, बाहुबली**

**शाळेचा निकाल – ९७.७४%**

१) साची सुनील तेरदाळे ९९.००%
श्रेयस संजय कुंभार ९९.००%
२) वृषाली सचिन कोंद्रे ९८.६०%
३) काव्या कपिल रोटे ९८ .००%

**४) विद्यासागर हायस्कूल, अकिवाट**

**शाळेचा निकाल – ९६.८०%**

१) अल्फाज सरवर मुगळे ९३.४०%
२) सानवी धनाजी गायकवाड ९२.२०%
३) तनिष्का अजित कोष्टी ९१.६०%
यशश्री आप्पासो मिठारे ९१.६०%

**५) दादा नाना भोकरे हायस्कूल, कवठेसार**

**शाळेचा निकाल – ९६.५५%**

१) संयम आण्णासो मगदूम ८८.४०%
२) कार्तिकी अमोल आडसुळे ८६.२० %
३) वेदान शशिकांत कांबळे ८३.२०%

**९) सरस्वती हायस्कूल, टाकळीवाडी**

**शाळेचा निकाल – ९६.००%**

१) अन्नपूर्णा पोपट खोत ९४.००%
२) दिपाली अजित निर्मळे ९३.८०%
३) श्रावणी श्रीधर सुतार ९२.००%

**६) रत्नसागर हायस्कूल, निमशिरगांव**

**शाळेचा निकाल – ९५.१४%**

१) श्रावणी अनिल चंदूरे ९१.६०%
२) मृण्मयी विनायक चौगुले ९१.००%
३) राधिका राहुल बन्ने ९०.६०%

**✻ आ. न. नांद्रेकर ज्युनि. कॉलेज, जयसिंगपूर**

**कॉलेजचा निकाल – ९८.६०%**

१) श्रावणी रजपूत (विज्ञान) ९१.१७%
२) शिवराज जगताप, (कला) ९०.६७%
सेजल मगदूम (विज्ञान) ९०.६७%
३) सृष्टी कडोलकर (कला) ८७.५०%

**✻ एम. जी. शहा ज्युनि. कॉलेज, बाहुबली**

**कॉलेजचा निकाल – ८५.९८%**

१) हर्षदा शहाजी पाटील (कला) ६९.५०%
२) प्रेरणा दिलीप कांदेकर (हॉर्टि.) ६८.३०%
३) समीक्षा सचिन चौगुले (वाणिज्य) ६६.५०%

---

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित शाळेतील शालांत परीक्षेचा निकाल

## : विदर्भ विभाग :

**१) कंकुबाई कन्या प्रशाला, कारंजा(लाड)**

**शाळेचा निकाल – ९९.३०%**

१) नाशित फातेमा सैय्यद कदीर ९९.२०%
२) अक्षरा संतोष गांजरे ९७.६०%
३) अमृता रवींद्र नाखले ९६.६०%

**२) श्री म. ब्र. आश्रम हायस्कूल, कारंजा (लाड)**

**शाळेचा निकाल – ९८.८५%**

१) अपेक्षा नरेश राऊत ९४.४०%
यश विजय इंगोले ९४.४०%
२) वेदिका गजानन मालगे ९१.६०%
३) दत्तराज शरद ठाकरे ९१.४०%

**३) गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर, वेरुळ**

**शाळेचा निकाल – ९६.६६%**

१) नैनेश किशोर चाणेकर ९९.२०%
२) तेजस किशोर ठेंगडे ९१.८०%
३) श्रुतिका राजेंद्र बहादुरे ९०.८०%

# गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित

## * प.महाराष्ट्र विभाग *

## प्रत्येक प्रशालेतील प्रथम क्रमांकप्राप्त विद्यार्थी


संदेश बुबणे १००%
जनतारा, जयसिंगपूर


साची तेरदाळे ९९.००%
एम. जी. शहा, बाहुबली


श्रेयस कुंभार ९९.००%
एम. जी. शहा, बाहुबली


मयूरी थोडसरे ९७.००%
सन्मती विद्यालय, तारदाळ


अन्नपूर्णा खोत ९४.००%
सरस्वती हाय.,टाकळीवाडी


अल्फाज मुगळे ९३.४०%
विद्यासागर हाय., अकिवाट


श्रावणी चंद्रे ९१.६०%
रत्नसागर हाय., निमशिरगाव


संयम मगदूम ८८.४०
भोकरे हाय., कवठेसार


श्रावणी रजपूत ९१.१७%
१२वी विज्ञान
नांद्रेकर ज्युनि., जयसिंगपूर


हर्षदा पाटील ६९.५०%
१२वी कला
एम. जी. शहा ज्युनि., बाहुबली

## *कर्नाटक विभाग -


सौम्या हरवी ९९.२०%
एस.जे.गर्ल्स हाय., तेरदाळ


Shreyansh Khemalapure
99.04%
भरतेश, बे.बागेवाडी


Soumya Kukanur
99.04%
भरतेश, बे.बागेवाडी


पृथ्वीराज सावंत ९७.६०%
गुरुकुलात प्रथम
ए.एस.पाटील,स्तवनिधी


प्रज्वल हळींगळी ९६.४८%
गुरुकुलात प्रथम
एस.एम.हाय., तेरदाळ


रिया कानडे ९४.२४%
पार्श्वमती वि., अकोळ


Pallavi Bhovi 93.80%
ध. खेमलापुरे, बे. बागेवाडी


सुरक्षा जाधव ८५.७६%
सन्मती विद्या., सिदनाळ


लक्ष्मी गाडदर ९८.८३%
१२वी वाणिज्य
J. V. Mandal
PU College, Terdal


कावेरी पुजारी ९५.३३%
१२वी कला
Bharatesh PU
College, Bagewadi

**सर्व यशस्वितांचे हार्दिक अभिनंदन..!!!**

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-05-2026

# प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित गुरुकुलांचा निकाल

**१) श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली**

**गुरुकुलचा निकाल -१००%**

| | |
|---|---|
| १) अर्यन शीतल माणकापुरे | ८७.८०% |
| २) मोहन मुप्पैय्या हिरेमठ | ८६.८०% |
| ३) कार्तिक किरण उपाध्ये | ८६.२०% |

**२) श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा लाड**

**गुरुकुलचा निकाल -१००%**

| | |
|---|---|
| १) स्वस्तिक सचिन नाके | ९०.६०% |
| २) नैतिक अतुल यंबल | ८२.२०% |
| ३) प्रेम अनंता वढावकर | ७९.४०% |

**३) कंकुबाई कन्या श्राविकाश्रम, कारंजा (लाड)**

**श्राविकाश्रमचा निकाल - १००%**

| | |
|---|---|
| १) कु. कृतिका विकास शेटे | ८६.२०% |
| २) कु. ईश्वरी गजानन महाजन | ८५.००% |
| ३) कु. संस्कृती राजू अलोने | ७९.८०% |

**४) श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, वेरूळ**

**गुरुकुलचा निकाल -१००%**

| | |
|---|---|
| १) चि. सार्थक मुरगुडे | ८७.८०% |
| २) चि. आर्यन म्हैशाळे | ८४.४०% |
| ३) चि. यश महाजन | ७७.२०% |

**५) श्री जिनसेनाचार्य गुरुकुल, तेरदाळ**

**गुरुकुलचा निकाल-१००%**

| | |
|---|---|
| १) प्रज्वल हळींगळी | ९६.४८% |
| २) ऋषिकेश वाळके | ९२.९६% |
| ३) अच्युत गुरव | ९२.३६% |

**६) श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम,स्तवनिधी**

**गुरुकुलचा निकाल -१००%**

| | |
|---|---|
| 1) Pruthviraj Sawant | 97.60% |
| 2) Somanna Pujari | 87.20% |
| 3) Prajwal Mathad | 83.68% |

**सर्व गुरुकुलांचा निकाल १००%**

***गुरुकुलात प्रवेश घ्या.... निश्चिंत रहा...***

*** गुरुकुलातील प्रथम क्रमांकप्राप्त विद्यार्थी - सर्व यशस्वितांचे हार्दिक अभिनंदन..!!!**



स्वस्तिक नाके ९०.६०%
म. ब्र. आश्रम, कारंजा



आर्यन माणकापुरे ८७.८०%
बाहुबली गुरुकुल



सार्थक मुरगुडे ८७.८०%
वेरुळ गुरुकुल



कृतिका शेटे ८६.२०%
कंकुबाई, कारंजा

प्रेषक, www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर-४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-05-2026
प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली
सन्मति : वर्ष ७६वे, पुष्प अकरावे : जून २०२६ : ४४ (४०+०४=४४)